कार्यालयीन उपयोगासाठी

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग

# कमी साक्षरता विभागातील शैक्षणिक समस्येचा विशेषता, आदिवासी जमातीतील स्त्रियांच्या शैक्षणिक समस्येचा अभ्यास अहवाल जिल्हा अमरावती व पुणे


आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
महाराष्ट्र राज्य, २८, क्वीन्स गार्डन,
पुणे – ४११ ००१.



१९९५

# प्रस्तावना

आदिवासी मुलांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा, त्यांना शिक्षणाची गोडी लागावी व शिक्षणाचा कोणत्याही प्रकारचा बोजा त्यांच्या पालकांवर पडू नये, या उद्देशाने महाराष्ट्रात आदिवासी आश्रमशाळा योजना १९७२ पासून सुरु झाली.

आदिवासी क्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी जास्त प्रमाणात शिक्षणाचा लाभ घ्यावा, उपस्थितीचे प्रमाण वाढावे यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळांमधून मुलांना सकस आहार व दररोज रु.१/- या प्रमाणे उपस्थिती भत्ता देण्यात येतो.

आदिवासींनी शिक्षणाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, निरक्षरतेचे प्रमाण कमी व्हावे व सर्वसामान्यजनांच्या प्रवाहात यावे यासाठी शिक्षण विभाग व आदिवासी विकास विभाग कार्यरत आहेत.

आजची पिढी शिक्षण घेण्याकडे आकृष्ट झालेली आहे. पालक स्वत: अज्ञानी असलेतरी मुलांनी शिक्षण घेऊन सज्ञान व्हावे व नोकरी करावी या अपेक्षा पालकांच्या मनात निर्माण झाल्या आहेत.पालकांचे हे मत परिवर्तन खूप बोलके आहे. जे पालक निरक्षर आहेत, लिहिता वाचता येत नाही, अशांच्यासाठी इ.स.२००१ पर्यंत संपूर्ण भारत साक्षर झाला पाहिजे. साक्षरतेचे प्रमाण १०० टक्के झाले पाहिजे हे शासनाचे धोरण आहे. शासनाच्या या धोरणानुसार महाराष्ट्रात साक्षरता अभियान मोहीम हाती घेण्यात आली.त्याचे निष्कर्ष तितकेच बोलके व फारच चांगले आहेत. संपूर्ण महाराष्ट्र साक्षर करण्याच्या शासनाच्या भूमिकेने मूर्त स्वरुप घेतले आहे. अशा प्रकारचा कार्यक्रम पुणे जिल्हयात यशस्वी होऊन ८० टक्के पेक्षा जास्त लाभार्थींनी याचा फायदा घेऊन साक्षरता मोहिमेस सहकार्य केले आहे.

अमरावती जिल्हा तुलनेने जास्त निरक्षर आहे. तथापि, तेथे साक्षरता कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरु होण्याच्या मार्गात आहे. तत्पूर्वी तेथे पायलट प्रोजेक्टचे काम सुरु आहे. कदाचित हा अहवाल पूर्ण होईपर्यंत तेथे साक्षरता प्रसाराची मोहिम सुरु करण्यात आली असेल.

प्रस्तुतच्या अभ्यास अहवालात ठाणे व पुणे जिल्हयातील आदिवासींची साक्षरता व निरक्षरतेची टक्केवारी दिली आहे. निरक्षरता जास्त असण्याची कारणे व निरक्षरता कमी होण्याच्या दृष्टीने स्वयंसेवी संस्था अथवा शासनाचे प्रयत्न यांची माहिती व निरक्षरता कमी करुन साक्षरता वाढविण्यासाठी उपाय योजनांचा अभ्यास करण्यात आला आहे.

हा संशोधन अहवाल तयार करण्याचे काम सौ.मंगल घोडे, संशोधन अधिकारी यांनी केले. श्रीमती उज्वला थोरात, सांख्यिकी सहाय्यक यांनी त्यांना सहाय्य केले. सदरहू माहितीचे पृथ:करण करुन संगणकीय अहवाल तयार करण्याचे काम श्री.जे.बी.अवचट, सांख्यिकी सहाय्यक यांनी केले. तसेच सदर अहवाल डी.टी.पी.वर टंकलिखित करण्याचे काम श्री.के.पी.कुर्डे. लघुटंकलेखक यांनी केले. पुणे जिल्हा प्रौढ शिक्षणाधिकारी यांनी अहवालासंदर्भात योग्य सूचना दिल्या.

हा अहवाल तयार करण्यासाठी ज्या प्रौढ निरक्षरांकडून प्रश्नावली भरुन घेण्यात आली, त्यांची ही संस्था आभारी आहे.

(डॉ.नवीनचंद्र जैन)
संचालक,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य,पुणे १

पुणे
दिनांक २०.७.९५

# अ नु क्र म णि का



| अ.क्र | विषय | पृष्ठ क्रमांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| | प्रास्ताविक | | |
| १. | महाराष्ट्र राज्यातील शिक्षणावर दृष्टीक्षेप | ४ | ९ |
| २. | मूल्यमापन अभ्यासाची पार्श्वभूमती, उदिष्टये आणि सर्व्हेक्षण पध्दती | १० | १३ |
| ३. | वैयक्तिक लाभार्थी प्रकरणांचा अभ्यास | १४ | २२ |
| ४. | सर्व्हेक्षण आकडेवारीचे संकलन व त्यावरील पार्श्वभूमती | २३ | २८ |
| ५. | क्षेत्रीय निरिक्षण व गळतीची कारणे | २९ | ३० |
| ६. | सूचना तथा शिफारशी | ३१ | - |
| ७. | प्रपत्र कमांक - १ : प्रौढांसाठी प्रश्नावली | | |

## *प्रकरण १ ले*

## महाराष्ट्र राज्यातील शिक्षणावर दृष्टीक्षेप

प्रास्ताविक :-

### १.१ भारतीय अर्थव्यवस्था व शिक्षण :-

भारतीय अर्थव्यवस्था ही शेतीप्रधान आहे. भारतातील ७० टक्के लोकांची उपजिविका शेतीवर अवलंबून आहे. शेती हे उत्पन्नाचे प्रमुख साधन असल्याने शिक्षणाचा विचार करणे जनतेला अत्यावश्यक वाटत नाही. आर्थिक विकास व शैक्षणिक विकास हे एकमेकांवर अवलंबून आहेत. आर्थिक विकासांवर लोकांचे राहणीमान व जीवनमान अवलंबून आहे. शैक्षणिक विकासाशिवाय केवळ आर्थिक विकास अशक्य.आहे.

आधुनिक समाजामध्ये शिक्षण ही मूलभूत गरज आहे. शिक्षणाने सामाजिक विषमता नष्ट होऊन न्याय व समता प्रस्थापित होईल.

### १.२ महाराष्ट्रातील सार्वजानिक प्राथमिक शिक्षण तरतूद :-

भारतीय राज्यघटनेच्या ४५ व्या कलमान्वये ६ ते १४ वयाच्या मुला-मुलींसाठी प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक करण्याची तरतूद आहे. तसेच मुलींसाठी इ.१२ वी पर्यंतचे शिक्षण मोफत करण्याची तरतूद आहे. इ.१ ली मध्ये विद्यार्थ्यांचे शाळेतील नांव नोंदणीचे प्रमाण मोठे आहे. परंतू शिक्षण अर्धवट सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे विशेषत: विद्यार्थीनीचे प्रमाण मोठे आहे ते खालील तक्त्यावरुन पाहू.

**तक्ता क्रमांक १.१**

**सर्वसाधारण मुलींचे गळतीचे प्रमाण**

| अ.क्र. | इयत्ता | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | ५ वी पर्यंत गळती | ४०.०२ |
| २. | ५ वी ते आठवी | २९.४३ |
| ३. | ८ वी ते दहावी | ३४.९४ |

एकूण विद्यार्थीनी प्रवेश घेतात त्यापैकी ४० टक्के विद्यार्थीली इ.५ वी च्या वर्गात येईपर्यंत गळतात. इ.८ वी ला येईपर्यंत २९.४३ टक्के विद्यार्थीनी शाळेतून गळतात.

## १.३ महाराष्ट्रातील आदिवासींसाठी शिक्षण तरतूद :-

शिक्षणाबाबत अनुसूचित जमातीमध्ये उदासिनता दिसून येते. पारंपारिक व्यवसाय, कौटुंबिक क्षेत्र विभागणी. छोटी मुले अर्थप्राप्तीसाठी मदत करतात, इत्यादीमुळे शिक्षणाबाबत अनुसूचित जमातीमध्ये कमालीची उदासिनता दिसून येते. व्हेरीअर एलविन यांनी एका ठिकाणी असे म्हटले आहे की, आदिवासी शिक्षणाचा प्रसार व प्रचार करणे हे बऱ्याच अडचणीचे आहे. अशा पार्श्वभूमीवर सामाजिक व आर्थिक समस्या, विशिष्ट अनुसूचित जमातीतील वैचित्र्यानुसार अडसर व शिक्षणाविषयीची उदासिनता या मूलभूत प्रश्नांमुळे/अडचणीमुळे आदिवासींचे शिक्षण ही बाब मागे पडत चाललेली आहे.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर ४५ वर्षे उलटली तरी आदिवासी जनतेत शिक्षणाचा प्रसार म्हणावा तितका झपाटयाने का होऊ शकला नाही याचा साकल्याने विचार करण्याची गरज आहे, आणि म्हणूनच कमी साक्षरता विभागातील शैक्षणिक समस्येचा विशेषत: स्त्रियांच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करण्याची गरज निर्माण झाली व हा मूल्यमापन अभ्यास अहवाल हाती घेण्यात आला आहे.

यासाठी प्रथम महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण किती आहे व अनुसूचित जमातीतील साक्षरतचे प्रमाण किती आहे याचा अभ्यास करणे संयुक्तिक होईल.

तक्ता क.१.२

**महाराष्ट्रातील आदिवासींचे साक्षरतेचे प्रमाण**

| अ.क्र | वर्ष | सर्वसामान्य साक्षरता प्रमाण | | | आदिवासी साक्षरता प्रमाण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| १. | १९६१ | ४२.०४ % | १६.७६% | २९.८२% | १२.५५% | ०१.७५% | ०७.२१% |
| २. | १९७१ | ५१.०४% | २६.४३% | ३९.१३% | १९.०६% | ०४.२१% | ११.७४% |
| ३. | १९८१ | ५८.६५% | ३४.६३% | ४७.०२% | ३२.३८% | ११.९४% | २२.२९% |
| ४. | १९९१ | ७६.५६% | ५२.३०% | ६४.८७% | ४९.०८% | २४.०३% | ३६.७७% |

संदर्भ :- जनगणना १९६१ ते १९८१

## १.४ <u>महाराष्ट्रातील जिल्हानिहाय साक्षरता</u> :-

१९९१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील एकूण साक्षरता व आदिवासींचीएकूण साक्षरता प्रमाण खालील तक्ता क्र.१.३ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

**तक्ता क.१.३**

**१९९१ च्या जनगणनेनुसार सर्वसाधारण व आदिवासी साक्षरतेचे प्रमाण**

| अ.क्र. | जिल्हा | सर्वसाधारण | | | आदिवासी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| १ | बृन्हमुंबई व | ८७.९० | ७५.८० | ८२.५० | ७७.६२ | ५६.८९ | ६८.२४ |
| २. | नाशिक | ७४.०० | ४९.९० | ६२.३० | ४१.१७ | १८.२५ | २९.८४ |
| ३. | धुळे | ६३.१० | ३८.८० | ५१.२० | ३३.७४ | १३.२४ | २३.५९ |
| ४. | जळगांव | ७७.५० | ५०.३० | ६४.३० | ४८.४० | २०.२५ | ३४.७० |
| ५. | ठाणे | ७७.६० | ६०.३० | ६९.५० | ३६.८२ | १४.५३ | २५.८४ |
| ६. | पुणे | ८१.६० | ५९.८० | ७१.१० | ५७.९५ | २९.६२ | ४४.२७ |
| ७. | अहमदनगर | ७५.३० | ४६.०० | ६१.०० | ४४.१० | १५.७९ | ३०.०५ |
| ८. | सोलापूर | ७०.१० | ४१.८० | ५६.४० | ६३.१२ | ३०.९१ | ४७.६९ |
| ९. | रायगड | ७६.०० | ५२.२० | ६३.९० | ३३.९७ | १७.३० | २५.७४ |
| १० | कोल्हापूर | ८०.३० | ५३.१० | ६६.९० | ७६.३८ | ४५.१७ | ६१.०६ |
| ११. | रत्नागिरी | ७६.६० | ५१.६० | ६२.३० | ४४.७६ | २०.०६ | ३२.२१ |
| १२. | सिंधुदुर्ग | ८६.२० | ६६.९० | ७५.८० | ७१.८९ | ५२.९९ | ६२.४५ |
| १३. | सातारा | ८०.६० | ५३.३० | ६६.७० | ६४.६४ | ३९.५६ | ५२.३८ |
| १४. | सांगली | ७४.८० | ४९.९० | ६२.६० | ६६.३७ | ४०.३७ | ५४.०५ |
| १५. | औरंगाबाद | ७२.९० | ३९.६० | ५६.९० | ४७.५४ | १७.१८ | ३२.८६ |
| १६. | जालना | ६४.४० | २७.३० | ४६.२० | ४७.९९ | १५.५३ | ३२.०८ |
| १७. | परभणी | ६४.९० | २९.४० | ४७.६० | ५०.७२ | १५.७८ | ३३.७८ |
| १८. | बीड | ६६.३० | ३२.३० | ४९.८० | ५४.९५ | २१.१० | ३८.३८ |
| १९. | नांदेड | ६४.४० | ३१.०० | ४८.२० | ५२.०८ | १९.१३ | ३६.०९ |
| २०. | उस्मानाबाद | ६८.४० | ३९.१० | ५४.३० | ५४.०३ | २३.४३ | ३९.४५ |
| २१. | लातूर | ७०.५० | ३९.७० | ५५.६० | ५८.७५ | २६.१८ | ४३.०९ |
| २२. | अमरावती | ७८.४० | ६१.१० | ७०.१० | ५५.९४ | ३२.४७ | ४४.५७ |
| २३. | बुलढाणा | ७६.५० | ४६.१० | ६१.७० | ५७.१० | २४.६६ | ४१.४० |
| २४. | अकोला | ७७.६० | ५३.३० | ६५.८० | ६५.२६ | ३६.०४ | ५१.०३ |
| २५. | यवतमाळ | ७०.४० | ४४.८० | ५७.९० | ५५.०९ | २७.२६ | ४१.४३ |
| २६. | नागपूर | ८१.८० | ६४.७० | ७३.६० | ७३.०३ | ५०.६४ | ६२.२१ |
| २७. | वर्धा | ७८.३० | ६१.०० | ६९.९० | ६५.५८ | ४४.७१ | ५५.४३ |
| २८. | भंडारा | ७८.८० | ५०.४० | ६४.७० | ६८.४९ | ३५.४४ | ५१.९३ |
| २९. | चंद्रपूर | ७१.३० | ४६.८० | ५९.४० | ६०.४४ | ३३.८२ | ४७.३० |
| ३०. | गडचिरोली | ५६.६० | २८.९० | ४२.९० | ४२.०७ | १७.७९ | ३०.०० |
| महाराष्ट्र राज्य | | ७६.५६ | ५२.३० | ६४.८७ | ४९.०८ | २४.०३ | ३६.७७ |

उपरोक्त तक्त्यावरुन सर्वसाधारण गटातील गडचिरोली, बीड, परभणी, जालना हे जिल्हे वगळता सर्व जिल्हयांमधील साक्षरता ५०% च्यावर आहे.

अनुसूचित जमाती गटातील भंडारा, नागपूर , अकोला या तीन जिल्हयामध्ये ५० टक्केच्यावर साक्षरतेचे प्रमाण आहे. त्यानंतर ४० टक्केच्यापुढे व ५० टक्केच्या आत साक्षरता असणारे पुणे, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, बुलढाणा अशा ५ जिल्हयांचा समावेश होतो. उर्वरित आदिवासी लोकसंख्या असणारे नऊ जिल्हे हे ४० टक्केपेक्षाही कमी साक्षरता असणारे आहेत.

## १.५ <u>पुणे जिल्हयातील शिक्षण व इतर बाबींबाबत सद्यस्थिती</u> :-

१९९१ च्या जनगणनेनुसार पुणे जिल्हयांची लोकसंख्या ५५,३२,५३२ ती महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ७ टक्के आहे. जिल्हयातील एकूण १८४४ खेडयांपैकी १८ खेडी ओसाड आहेत. जिल्हयातील एकूण लोकसंख्यपैकी ४९ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात आहे व जिल्हयातील साक्षरतेचे प्रमाण ७१.१० टक्के असून ते राज्याच्या साक्षरतेच्या ६४.८७ टक्के आहे.

१९९१ च्या जनगणनेनुसार अनुसूचित जमातीची लोकसंख्या २,१६,३३६ इतकी होती.

*साक्षरता*

१९९१ च्या जनगणनेनुसार जिल्हयात ३२,२५,२२८ म्हणजेच ७१ टक्के लोक साक्षर होते. साक्षरतेचे प्रमाण (० ते ६ वयोगट वगळता ) नागरी व ग्रामीण भागात अनुक्रमे ५१ व ४९ टक्के होते. स्त्री पुरुषानुसार साक्षरतेचे प्रमाण पाहता असे आढळते की, जिल्हयात साक्षर स्त्री पुरुष प्रमाण अनुक्रमे ६० व ८२ टक्के आहे.

*प्रौढ शिक्षण*

फेब्रुवारी १९७९ पासून जिल्हयामध्ये प्रौढ शिक्षण कार्यक्रम सुरु झाला. कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी जिल्हयात १५ ते ३५ वयोगटात ६,८४,५१० निरक्षर प्रौढ होते. जिल्हयामध्ये मार्च, १९९३ अखेर २४,६७२ प्रौढ शिक्षण केंद्र कार्यरत होती. या सर्व केंद्रामधून मार्च, १९९३ अखेर २४६७०७ प्रौढ साक्षर झाले. साक्षरता आंदोलन मंच, पुणे च्या विषयाने संपूर्ण पूर्ण जिल्हयात साक्षरता मोहीम दि.४.१२.९२ पासून कार्यान्वित केली आहे. त्यामुळे वरील सर्व प्रौढ शिक्षण केंद्र शासन निर्णयानुसार दि.३०.१०.९१ पासून बंद केली आहेत.

उपरोक्त तक्त्यावरुन पुणे जिल्हयाची साक्षरतेची टक्केवारी अमरावती जिल्हयापेक्षा जास्त असल्याचे आढळून येते. स्त्री साक्षरतेचे प्रमाणही पुणे जिल्हयात थोडेसे अधिक असल्याचे आढळून येते. पुणे जिल्हयातील साक्षरता दर दहा वर्षांनी सरासरी ८.७८ टक्क्यांनी वाढल्याचे आढळून आले. तर अमरावती जिल्हयाचा साक्षरता दर दहा वर्षांनी सरासरी ९.१ टक्के इतकी वाढल्याचे आढळून येते.

अमरावती जिल्हयांचा साक्षरता दर तुलनेने जास्त असला तरी एकूण टक्केवारीमध्ये मात्र अमरावती जिल्हा एकूण जिल्हयाच्या टक्केवारी तुलनेत मागे पडतो. याची कारणे एकूण लोकसंख्येचे प्रमाण कमी अधिक असणे हे होय.

## १.६ अमरावती जिल्हयातील शिक्षण व इतर बाबींबाबत सद्यस्थिती :-

१९९१ च्या जनगणनेनुसार अमरावती जिल्हयाची एकूण लोकसंख्या २२,००,०५७ होती. यापैकी ६४ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात आढळते तर ३६ टक्के लोकसंख्या नागरी भागात वसलेली आहे. अमरावती जिल्हयातील साक्षरतेचे प्रमाण ७०.१० असून राज्याशी तुलना करता ५२ टक्के इतके आहे.

१९९१ च्या जनगणनेनुसार जिल्हयातील अनुसूचित जमातीचे प्रमाण १४.३६ टक्के इतके आहे.

*साक्षरता*

१९९१ च्या जनगणनेप्रमाणे एकूण लोकसंख्येशी ७०.१० लोकसंख्या साक्षर आहे. साक्षर लोकसंख्येमध्ये ७८.४० पुरुष व ६१.१० टक्के स्त्रिया आहेत.

*प्रौढ शिक्षण*

अमरावती जिल्हयात संपूर्ण साक्षरता अभियान कार्यान्वित करावयाचे आहे. त्याकरिता शासनातर्फे या जिल्हयाची निवड करणात आली आहे.

## १.७ प्रौढ शिक्षण कार्यक्रम :-

महाराष्ट्र १०० टक्के साक्षरत झालाच पाहिले हेच उदिष्टय नजरेसमोर ठेवून केंद्र व महाराष्ट्र राज्य शासनाने साक्षरता आंदोलन अभियान हा कार्यक्रम, १९८८ मध्ये सुरु केला व दरवर्षी दोन जिल्हयामध्ये हा कार्यक्रम राबविण्यास प्रारंभ केला. जिल्हाधिकारी हे या कार्यक्रमाचे अध्यक्ष असतात. जिल्हा प्रौढ शिक्षणाधिकाऱ्यांच्या मागदर्शनाखाली तालुका पातळीवर व गांव पातळीवर कार्यक्रम राबविला जातो. प्रथम गांवातील १८ ते ३५ वयोगटातील निरक्षरांची यादी तयार करण्यात येते व १० ते १२ प्रौढ निरक्षरांसाठी एक व साक्षर करण्यासाठी त्या गांवातीलच साक्षर सेवाभावी व्यक्तींची नेमणूक होते. निरक्षरांना शिकविणारे शिक्षक हे स्वयंसेवक असतात. त्यांना मानधन किंवा पगार दिला जात नाही. ते स्वेच्छेने हे काम स्विकारतात. मंदिर वा घरात अशाप्रकारचे प्रौढ साक्षरता वर्ग सायंकाळी दोन ते ३ तास भरविण्यात येतात. निरक्षरांच्या प्रमाणावर या वर्गाची संख्या अवलंबून असते. ६ महिन्यांनी व त्यानंतर एक वर्षाने प्रौढांचे मूल्यमापन घेतले जाते. यात लेखन, वाचन, पत्र लेखन, अर्ज लेखन, गाणी म्हणणे इ.चा समावेश असतो. ७० टक्केच्या वर गुण मिळविणारी व्यक्ती साक्षर झाली असा निकष लावून साक्षरता निरक्षरता ठरविण्यात येते. निरक्षर व्यक्तीस पुन: ६ महिने अभ्यास करावयास लावून त्यानंतर मूल्यमापन केले जाते व त्यामध्ये उत्तीर्ण झाल्यास ती व्यक्ती साक्षर झाली, असे ठरविले जाते.

१.८ प्रौढांना साक्षर करण्यासाठी शासनाने उभारलेले 'साक्षरता अभियान कार्यक्रम'आदिवासी उपयोजना क्षेत्रामध्ये कितपत यशस्वी झाले याचा अभ्यास करण्यासाठी कमी साक्षरता विभागातील अमरावती व बऱ्यापैकी साक्षरतेचा प्रसार झालेल्या पुणे जिल्हयाचा समावेश करण्यात आला. यामध्ये अनुसूचित जमातीतील स्त्री-पुरुषांच्या सारक्षतेचे प्रमाण ते कमी असण्याची कारणे व त्यावर उपाययोजना यांचा अभ्यास करण्यात आला. पुणे व अमरावती जिल्हयातील मागील ४० वर्षातील साक्षरतेचा इतिहास पाहिल्यास आपल्याला खालील निकर्ष्ष आढळून येतात.

तक्ता क्र.१.४

पुणे व अमरावती जिल्हयातील अनुसूचित जमातीतील स्त्री-पुरुष साक्षरतेची टक्केवारी

| अ. क्र. | वर्ष | पुणे | | | अमरावती | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| १. | १९५१ | ३९.२७ | १५.२६ | २७.६८ | ३७.५५ | १०.६८ | २४.५२ |
| २. | १९६१ | ४६.१८ | २१.७४ | ३४.३१ | ४५.९१ | २०.५७ | ३३.६८ |
| ३. | १९७१ | ५६.३० | ३२.१० | ४४.६२ | ५२.२८ | ३१.६९ | ४२.३६ |
| ४. | १९८१ | ६५.१६ | ४२.१४ | ५४.०३ | ६०.५० | ४२.५५ | ५१.८२ |
| ५. | १९९१ | ५२.७४ | २४.०५ | ३६.७२ | ५२.७८ | २९.०१ | ४१.२८ |

## *प्रकरण दुसरे*

## मूल्यमापन अभ्यासाची पार्श्वभूमी, उदिष्टये आणि सर्वेक्षण पध्दती

### २.१ मूल्यमापन अभ्यासाची पार्श्वभूमी :-

इ.स. १९९१-९२ मध्ये भारतातील सर्व आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थांच्या संचालकांची दिल्ली येथे परिषद भरली होती. सदर बैठकीस सचिव, आदिवासी विकास यांनी आदिवासींमधील साक्षरता विशेषतः स्त्रियांची साक्षरता यांचे प्रमाण, साक्षरता कमी असण्याची कारणे व त्यावर उपाययोजना सुचविणारा मूल्यमापन अहवाल तयार करुन तो केंद्र शासनास सादर करावा, असे सुचविले. त्यानुसार आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी हा मूल्यमापन अहवाल १९९१-९२ या आर्थिक वर्षामध्ये हाती घेतला आहे.

### २.२ मूल्यमापन अहवालाची उदिष्टये :-

हा मूल्यमापन अहवाल तयार करण्यासाठी खालील उदिष्टये नजरेसमोर ठेवण्यात आली होती-

१. स्त्रिया व पुरुषांसाठी उपलब्ध शैक्षणिक सुविधांचा अभ्यास करणे- उदा. प्रौढ साक्षरता वर्ग, अंशकालीन वर्ग, रात्रीच्या शाळा ( Night school ) इ.

२. उपलब्ध शैक्षणिक सोयींचा सखोल अभ्यास करणे.

३. स्त्रिया व पुरुष साक्षरता प्रसारासाठी असणाऱ्या अशा शैक्षणिक संस्थांची व कार्यक्रमांची उपयुक्तता कितपत आहे हे अजमावणे

४. प्रौढ साक्षरता वर्गांना व इतर शैक्षणिक सुविधांना स्त्रियांचा व पुरुषांचा प्रतिसाद अजमावणे. शिक्षण घेण्यामध्ये अनुसूचित जमातीतील स्त्रियांना येणाऱ्या अडचणी, स्त्री शिक्षणाला कमी प्रतिसाद मिळण्याची कारणे यांचा सखोल अभ्यास करणे

५. आदिवासी विभागात प्रौढ शिक्षणाचे वर्ग चालविणाऱ्या स्वयंसेवी शिक्षकांना या विभागात वर्ग चालवितांना येणाऱ्या अडचणी जाणून घेणे.

६. आदिवासी स्त्रिया व पुरुषांमधील साक्षरतेचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविणे.

### २.३ अहवाल तयार करण्यासाठी निवडलेल्या निरक्षरांचे पाहणीतील संदर्भ वर्ष :-

अनुसूचित जमातीतील स्त्रियांच्या व पुरुषांच्या शैक्षणिक समस्येचा अभ्यास करण्यासाठी व शैक्षणिक समस्येचा प्रश्न सोडवून कोणती उपाययोजना करता येईल याचा अभ्यास करण्यासाठी १९९२-९३ या वर्षातील त्या जिल्हयामध्ये उपलब्ध असणाऱ्या १५ ते ३५ या वयोगटातील स्त्रियांचा निवड करण्यात आली.

## २.४ क्षेत्रीय पाहणी :-

क्षेत्रीय कामकाज पाहणीमध्ये धारणी तालुक्यातील तसेच पुणे जिल्हयातील जुन्नर, आंबेगांव तालुक्यातील निरक्षरांच्या व साक्षरांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात आल्या. यासाठी दुर्गम व अति दुर्गम गांवे रस्त्यावरील गांवे निवडण्यात आली.

तसेच क्षेत्रीय कामकाज पाहणीमध्ये जिल्हा, तालुका, गांव व कुटुंब स्तरावरील माहिती व प्रशासकीय अधिकाऱ्यांचे अभिप्राय मुलाखतीद्वारे गोळा करण्यात आले.

## २.५ पाहणीत भरावयाची पत्रके:-

क्षेत्रीय पाहणीमध्ये कुटुंबस्तरावरील माहिती गोळा करण्यात आली. प्रशासकीय अधिकाऱ्यांचे अभिप्राय मुलाखतीद्वारे गोळा करण्यात आले. यासाठी दोन प्रकारची पत्रके तयार करुन त्यामध्ये माहिती गोळा केली आहे.

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील कमी साक्षरता विभागातील शैक्षणिक समस्येचा विशेषत: स्त्रियांच्या शैक्षणिक समस्यांचा अभ्यास करण्याकरिता सहयाद्री विभागातील पुणे जिल्हा व गोंड विभागातील अमरावती जिल्हयाची निवड करण्यात आली. अमरावती जिल्हयातील कोरकू व पुणे जिल्हयातील प्रामुख्याने महादेव कोळी या अनुसूचित जमातींच्या तुलनात्मक अभ्यास करण्यात आला. कोरकू जमात अत्यंत मागासलेली तर महादेव कोळी ही जमात तुलनेने विकसनशील आहे. याचा उद्देश असा की, त्यामधून येणारे निष्कर्ष सर्वकष स्वरुपाचे यावेत. यासाठी पुणे जिल्हयातील जुन्नर, आंबेगांव व खेड तालुक्यांचा समावेश करण्यात आला तर अमरावती जिल्हयातील धारणी तालुक्यांचा समावेश करण्यात आला.

## २.६ गांव : निरक्षर व साक्षरांची निवड :-

पुणे जिल्हयातील उपयोजना क्षेत्रातील ३ गांव निवडलेली असून तेथील एकूण १२७ निरक्षराची सर्वेक्षणासाठी निवड करण्यात आली. निरक्षर व साक्षरांमध्ये महिला निरक्षरांना प्राधान्य देण्यात आले. यासाठी रस्त्यालगतची गांवे अति दुर्गम गांवे व दुर्गम भागातील गांवे अशी निवड करण्यात आली आहे. या मागील उद्देश हा की पाहणीतील निष्कर्ष सर्वकष स्वरुपाचे यावेत. सभोवतालच्या परिसराचा व डोंगराळ भागातील समस्यांचा शिक्षणावर काय परिणाम होतो, हे स्पष्ट व्हावे, या मागील हेतू आहे.

नमुना निवडीसाठी निवडलेल्या निरक्षरांचे विवरण खालील तक्त्यात दिलेले आहे.

तक्ता क्र.२.१

पुणे व अमरावती जिल्हयातील निरक्षरांची संख्या दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | पुणे जिल्हा | | | अमरावती जिल्हा | | | एकूण लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | तालुका | गांवाचे नांव | लाभार्थी संख्या | तालुका | गांवाचे नांव | लाभार्थी संख्या | |
| १. | जुन्नर | १. तळेरान | ३५ | १.धारणी | १. राजपूर | १४ | पुणे १२७ |
| | | | | | २.दुनी | १५ | अमरावती ०८७ |
| २. | आंबेगांव | २. गोहे खुर्द | ५० | | ३. चाकदी | ०५ | |
| | | ३. गोहे बु. | ४२ | | ४.चुटीयाँ | १० | |
| | | | | | ५. धूळघाट | ०६ | |
| | | | | | ६. शेरा | १० | |
| | | | | | ७. कलमखार | १० | |
| | | | | | ८. साद्रीवाडी | ०८ | |
| एकूण | | | १२७ | | ९. बैरागड | ०९ | एकूण २१४ |

उपरोक्त तक्त्यावरुन नमुना निवडीसाठी १२७ निरक्षर लाभार्थी हे पुणे जिल्हयातून निवडण्यात आले होते तर ८७ निरक्षर लाभार्थी हे अमरावती जिल्हयातून निवडण्यात आले होते. अमरावती जिल्हयांमध्ये साक्षरतेची सांख्यिकी माहिती व निरक्षरतेच्या याद्या तयार झाल्या होत्या. साक्षरतेचे वर्ग नुकतेच सुरु होण्याच्या मार्गावर होते. परंतू प्रशासकीय व आर्थिक मंजूरी अभावी साक्षरतेचे काम सुरु झालेले नव्हते. काही तुरळक ठिकाणी वर्ग सुरु ठेवण्याचे काम सुरु होते.

उपरोक्त लाभार्थींमध्ये २६ लाभार्थी हे इतर जमातीचे आहेत.

| प्रपत्र क्र.१ | विषय |
|---|---|
| १ | लाभार्थ्यांसाठी प्रपत्र |
| २ | कार्यान्वय अधिकाऱ्यासाठी प्रपत्र |

*प्रपत्र क्र. १* कमी साक्षरता विभागातील साक्षर व निरक्षरक स्त्रियांशी संपर्क साधून हया प्रपत्रातील सर्व माहिती गोळा केलेली आहे.

*प्रपत्र क्र. २* प्रौढ साक्षरता आंदोलन कार्यक्रमात सहभागी झालेले अधिकारी, स्वयंसेवक,अशासकीय पदाधिकारी व सामाजिक कार्यक्रर्त्यांसाठी प्रश्नावली

गांवामध्ये, तालुक्यामध्ये साक्षरता आंदोलन अभियान कार्यक्रमात ज्या स्वयंसेवकांना, सामाजिक कार्यकर्त्यांना आवड आहे, अशा सामाजिक कार्यकर्त्यांकडून , पदाधिकाऱ्यांकडून व अधिकाऱ्यांकडून ही प्रश्नावली भरुन घेतली आहे. तसेच शासकीय अधिकारी यांचेकडून प्रश्नावली भरुन घेण्यात आली आहे.

## २.७ निरक्षर कुटुंबाची निवड

सर्वेक्षणासाठी निवडलेल्या विभागांतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रातील निरक्षरांची संख्या लक्षात घेता सर्वच्या सर्व आदिवासी निरक्षर लाभार्थी कुटुंबांच्या मुलाखती घेणे वेळेच्या अभावी व क्षेत्रीय पाहणीसाठी निवडलेल्या कर्मचारीवृंदाच्या अपूरेपणामुळे शक्य नव्हते. म्हणून *रॅण्डम* सॅम्पल पध्दती वापरुन निरक्षर कुटुंबाची निवड करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार निवडलेले लाभार्थी तक्ता क.२.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

# प्रकरण ३ रे

## उदाहरणादाखल काही वैयक्तिक लाभार्थी प्रकरणांचा अभ्यास

३.१ कमी साक्षरता विभागातील शैक्षणिक समस्येचा विशेषत: स्त्रियांच्या शैक्षणिक समस्यांचा एकत्रित अभ्यासाशिवाय काही वैयक्तिक प्रकरणांच्या शेक्षणिक अडचणींचा अभ्यास करण्याचे ठरविल्यामुळे काही निवडक प्रकरणांच्या अभ्यासासाठी खालील प्रमुख उदिष्टये ठरविण्यात आली.

१. निरक्षर आदिवासी शेतकऱ्यांसाठी चालविल्या जाणाऱ्या प्रौढ साक्षरता वर्गाचा प्रभाव व परिणामांची स्थिती तपासणे.

२. प्रौढ साक्षरता वर्ग चालविले जात असल्यास त्यास उपस्थित राहण्यामध्ये येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

३. प्रौढ साक्षरता वर्गाची स्थिती तपासणे.

४. प्रौढ साक्षरता वर्ग अधिक चांगल्या रितीने राबविण्यासाठी साक्षर व निरक्षर आदिवासींची मते/अभिप्राय अजमावणे.

५. प्रौढ साक्षरता वर्गामुळे आदिवासींची आर्थिक सुधारणा कितपत झाली याचा शोध घेणे.

६. नसल्यास त्यामागील कारणांचा शोध घेणे.

३.२ जुन्नर तालुक्यातील नानीची वाडी तळेरान येथील महादेव कोळी जमातीचे सदरहू लाभार्थी- निरक्षर असून त्यांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. या व्यतिरिक्त त्यांचा अन्य दुय्यम व्यवसाय नाही.

त्यांच्या मालकीची एकूण ३ एकर जमीन असून त्यांचे वार्षिक उत्पन्न रु.२०००/- इतके आहे. उत्पन्नानुसार त्यांचा समावेश दारिद्रय रेषेखालील गटात होतो.

सदर निरक्षर लाभार्थ्यांचे वय ३० वर्षे असून पत्नी व दोन मुले मिळून ४ माणसाचे कुटुंब आहे.लाभार्थी हा आई-वडिलांनी शाळेत दाखल न केल्यामुळे शिक्षणापासून वंचित राहिला आहे. शिक्षण घेण्याची लाभार्थ्यास इच्छा आहे. त्यासाठी तो दररोज संध्याकाळी गांवातील प्रौढ साक्षरता वर्गांना जात असतो. नियमितपणे साक्षरता वर्गांना उपस्थित राहता येत नसल्याचे लाभार्थींनी सांगितले. याची कारणे जाणून घेतली असता, दररोज संध्याकळी कामावरुन दमून आल्यावर परत शाळेत शिक्षण घेण्याचा कंटाळा येतो व पाटीवर अक्षरे व अंक लिहिण्यास हात वळत नाहीत. अभ्यास आत्मसात होत नसल्याने मनामध्ये न्यूनगंडाची भावना निर्माण होऊन प्रौढ साक्षरता वर्गास अनुपस्थित राहण्यामध्ये दिसून आला.

निरक्षरतेमुळे येणाऱ्या अडचणीमुळे लाभार्थीस अनेकवेळा पश्चाताप होतो. उदा.हिशोब येत नाही. दुकानदार अशिक्षितपणाचा फायदा घेऊन वजनात फसवतात. उरलेले पैसे व्यवस्थिपणे परत देत नाहीत. हिशोबात घोळ करतात. तसेच निरक्षर असल्याने वाचता येत नाही. परगांवी जावयाचे झाल्यास एस.टी.गाडयावरील पाटया वाचत येत नाहीत. इ.प्रकारच्या अडचणी येत असल्याने लाभार्थी वारंवार अडचणीत येतो. स्वत:च्या चुकांचा पश्चाताप होऊन मुलांवर परत

हेच संकट येऊ नये, म्हणून लाभार्थ्यास मुलाने तरी शिक्षण घ्यावे, असे वाटते. लाभार्थ्यांचा मोठा मुलगा काशिनाथ ६ वर्षाचा असून तो इयत्ता १ ली मध्ये शिक्षण घेत आहे. लाभार्थ्यांचा दुसरा मुलगा हनुमंत हा अद्याप लहान (वय वर्ष १) असून शाळेत जाण्याच्या वयोगटातील नाही.

लाभार्थी डिसेंबर, १९९२ मध्ये प्रौढ साक्षरता वर्गांना उपस्थित राहू लागला. त्यांच्या वर्गामध्ये एकूण १० ते १२ प्रौढ प्रशिक्षणार्थी असून त्यात महिलांची संख्या मोठया प्रमाणात आहे. लाभार्थ्यास नियमित उपस्थित राहता येत नसले तरी ज्यावेळी तो उपस्थित राहतो, त्यावेळी आत्मसात करण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यांना सहीचे महत्व समजले असून हिशोब करता येऊ लागले आहेत.

३.३ जुन्नर तालुक्यातील वसईची वाडी येथील ही निरक्षर महिला महादेव कोळी जमातीची असून त्यांच्या कुटुंबांचा मुख्य व्यवसाय 'वनोत्पादन' हा आहे. जंगलातील हिरडा, डिंक आणून विकणे, त्या व्यतिरिक्त मोलमजूरी हा त्यांचा दुय्यम व्यवसाय होय.

हे कुटुंब भूमीहीन असून त्यांचे वार्षिक उत्पन्न रु.६००/- इतके आहे. उत्पन्नानुसार त्यांचा समावेश दारिद्रय रेषेखालील गटात होतो. त्यांना कोणत्याही शासकीय योजनांची माहिती नाही व लाभही झालेला नाही. अत्यंत निकृष्ट प्रतीचे जीवन जगणारे हे कुटुंब त्यांच्याकडे जमीन व पशुधन नाही. सदर निरक्षर लाभार्थीचे वय अंदाजे ३० वर्षाचे असून पतीचे वय अंदाजे ३५ वर्षे आहे. त्यांना ९ वर्षे वयाचा शिवाजी व ५ वर्ष वयाचा तान्हाजी अशी दोन मुले आहेत. असे एकूण ४ माणसाचे हे कुटुंब आहे.

निरक्षर लाभार्थी ही महिला आहे.सध्याच्या आर्थिक समस्येला व कौटुंबिक परिस्थितीला सामोरे जाताना त्या निरक्षर महिलेस अत्यंत बिकट समस्यांना तोंड द्यावे लागते आहे. आपणही साक्षर व्हावे व आपल्या मुलांनी शिक्षण घेऊन या परिस्थितीतून बाहेर पडावे, अशी तिची मनोमन इच्छा बोलण्यातून वारंवार प्रगट होत होती. सदर महिलेस दारिद्रय,अज्ञान, अंधश्रध्दा, व मुलाचे आजारपण याने ग्रासून टाकले आहे. तिचा मोठा मुलगा शिवाजी वय वर्षे ९ वर्षे पूर्ण. हा सतत आजारी असतो. त्याला वारंवार फिटस येत असल्याने शाळेत जात नाही. हा मुलगा शिक्षण घेऊ शकत नाही. दुसरा मुलगा तानाजी वय वर्षे ५ हा बालवाडीमध्ये शिकत आहे. या मुलाने शिक्षण घेऊन मोठे व्हावे, नोकरी करावी व आईवडिलांना सुखाचे दिवस यावेत, अशी आशा या महिलेने व्यक्त केली.

स्वत: अशिक्षित असल्याने शिक्षणाचे महत्व समजून आहे. पण परिस्थितीपुढे जाऊ शकत नाही. निरक्षरतेमुळे दुकानदार फसवतो, रेशन दुकानदार फसवतो, सावकाराकडून पिळवणूक होते. शासनाच्या वेगवेगळया योजनांची माहिती होत नाही. त्यासाठी कोणाकडे संपर्क साधावा लागतो याचे ज्ञान नाही. प्रवास कधी केलेला नाही. तालुक्याच्या गांवाला जाण्याचा देखील प्रसंग अद्याप आलेला नाही.

शिक्षणाची आवड आहे, धडपड आहे, त्यामुळे गांवात साक्षरता वर्ग सुरु झाल्यावर नियमितपणे साक्षरता वर्गांना उपस्थित राहतात. त्यांच्याबरोबर साक्षरता वर्गांना आणखी १० निरक्षर महिला येतात. श्री.काळे हे त्यांचे वर्गाचे शिक्षक आहेत. साक्षरता वर्गांना यायला लागल्यपासून त्यांना मूळाक्षरे व अंक ओळखता येऊ लागले आहेत. स्वत:ची सही त्या करतात.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन मुलांनी शिक्षण ध्यावे व चांगले दिवस यावेत, अशी मनिषा बाळगून आहेत.

३.४ पुणे जिल्हयातील जुन्नर तालुक्यातील मु.कोकाटे, पोस्ट-तळेरान येथील ही निरक्षर महिला. महादेव कोळी जमातीची असून त्यांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. त्या व्यतिरिक्त शेतमजूरी हा दुय्यम व्यवसाय होय. त्यांच्या मालकीची एकूण ५ एकर कोरडवाहू जमीन असून त्यापासून त्यांना रु.२५००/- एवढे वार्षिक उत्पन्न मिळते. उत्पन्नानुसार त्यांचा समावेश 'दारिद्रय रेषेखालील' गटात होतो. संबंधित निरक्षर महिलेचे अंदाजित वय २५ वर्षे असून पतीचे वय ३५ वर्षे आहे. या निरक्षर महिलेचा पती साक्षर आहे. त्यांना ६ वर्षे वयाची वनिता व ७ वर्षे वयाची अनिता ही दोन अपत्ये व आणखी दोन अपत्ये आहेत. असे एकूण ६ व्यक्तीचे हे कुटुंब आहे.

कुटुंबातील तीन व्यक्ती साक्षर असून दोन मुले लहान आहेत. ही महिला निरक्षर आहे. ही महिला निरक्षर असल्याने त्यांना व्यावहारिक अडचणी निर्माण होतात. हिशोब नीट जमत नाही. वाचणे व सही करणे अवगत नाही. दुकानांच्या पाट्या वाचता येत नाही. सावकराकडून उसने पैसे घेतल्यावर त्याची परतफेड करतांना फसवणूक होते.

संबंधित महिलेला साक्षर व्हावेसे वाटते. त्यासाठी ती (गांवातील) वसतीतील साक्षरता वर्गांना जात असते. गांवात एकूण ३ साक्षरता वर्ग आहेत. ती ज्या वर्गात जाते, तेथे रामचंद्र हेमा कोकाटे नांवाचे शिक्षक मार्गदर्शन करतात.

साक्षरता वर्गांना नियमित उपस्थित रहावेसे वाटत असले तरी वर्ग दररोज भरत नाहीत. त्यामागील कारणे जाणून घेतली असता रात्रीच्या वेळी वर्ग चालवायला रॉकेल पुरवठा होत नसल्याने दिवाबत्ती लावता येत नाही. पर्यायाने वर्ग बंद ठेवावे लागतात. तसेच या वर्गांना पुरविण्यात येणारी पुस्तके, पाटया, पेन्सिली या निम्म्या महिलांना मिळाली. उर्वरित महिलांना स्टेशनरी शेवटपर्यंत मिळत नाही. त्यामुळे साक्षरता वर्ग भरत नाहीत. अशाप्रकारच्या अडचणी येत असल्याचे या महिलेने सांगितले.

३.५ पुणे जिल्हयातील जुन्नर तालुक्यातील तळेरान येथील महादेव कोळी जमातीचे सदरहू लाभार्थी निरक्षर असून त्यांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. त्या व्यतिरिक्त शेतमजूरी हा त्यांचा दुय्यम व्यवसाय आहे.

हा लाभार्थी भूमीहीन आहे. तथापि, दुसऱ्याच्या मालकीची शेतजमीन स्वत: करुन त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातील/अन्नधान्यातील निम्मा हिस्सा त्याला मिळतो व उर्वरित दिवसात तो शेतमजूरी करतो. या सर्व मार्गांनी त्याला मिळणारे वार्षिक उत्पन्न रु.१२००/- इतके आहे. उत्पन्नानुसार या निरक्षर लाभार्थीचा समावेश दारिद्र रेषेखालील गटात होतो.

सदर निरक्षर लाभार्थीचे वय ३० वर्षे आहे. एकूण ४ माणसांचे कुटुंब आहे. कुटुंबात वडिल, पत्नी व एक दोन वर्षाचा मुलगा अशा ४ व्यक्ती आहेत. पत्नी निरक्षर आहे. आई वडिलांनी शाळेत न घातल्यामुळे लाभार्थी शिक्षणापासून वंचित राहिला आहे. प्रौढ साक्षरता वर्गामध्ये शिक्षण घेण्याची लाभार्थ्यास इच्छत्त आहे. परंतू प्रौढ शिक्षण वर्ग गेली कित्येक दिवस बंद असल्याने सदर लाभार्थ्यांचा त्याचा लाभा घेता येत नाही.

निरक्षरतेमुळे लाभार्थ्यास दैनदिन जीवनातील आर्थिक व सामाजिक जीवनात अनंत समस्या निर्माण होता. उदा.दूध डेअरीमध्ये दूध घातल्यावर दर महिन्याला पगार घेताना दूधाचे हिशोब, किती लिटर दूध दिले, पैसे किती दिले. पावती कितीची दिली हे समजत नाही. तलाटी,सरपंच यांच्याकडे कोणत्या कामासाठी अर्ज करायचा व कसा करायचा याबाबत अज्ञान असते. बॅंकेचा व्यवहार करता येत नाही.

३.६ जुन्नर तालुक्यातील दांडाची वाडी येथील महादेव कोळी जमातीची सदरहू लाभार्थी निरक्षर असून त्यांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. या व्यतिरिक्त शेतमजूरी हा त्यांचा दुय्यम व्यवसाय होय.

त्यांच्या मालकीची एकूण ३ एकर कोरडवाहू जमीन असून त्यांचे वार्षिक उत्पन्न रु.११००/- इतके आहे. उत्पन्नानुसार त्यांचा समावेश दारिद्र रेषेखालील गटात हातो. सदर महिला ३० वर्षे वयाची असून तिचा पतीचे वय ३५ वर्षे - हा साक्षर आहे. त्यांना विक्रम नांवाचा ७ वर्षे वयाचा व यशोदा ही ५ वर्षाची मुलगी व दत्ता वय वर्षे ८ महिने अशी तीन अपत्ये आहेत. विक्रम हा इ.१ ली, यशोदा ही बालवाडी व दत्ता अद्याप शाळेत नाही. सदर महिला निरक्षर राहण्याचे कारण म्हणजे घरकाम करण्यासाठी त्या महिलेला पालकांनी तिला शाळेत न पाठविता घरीच ठेवले.

ही महिला साक्षरता वर्गांना उपस्थित राहू शकत नाही. याचे कारण जाणून घेतले असता, त्यांच्या गांवातील प्रौढ साक्षरता वर्ग गेली कित्येक दिवस बंद आहे. तथापि, त्यांच्या मुलांनी शिक्षण घ्यावे, असे मात्र निरक्षर महिलेला वाटते. महिलेच्या निरक्षरतेमुळे वाचता व लिहिता येत नाही. अंगठा, कोणत्या कारणासाठी करावा, याचे ज्ञान नाही. दुकानात गेल्यावर वस्तु घेतानाच हिशोब नीट जमत नाही. डिसेंबर, १९९२ मध्ये हे वर्ग सुरु झाले. मंगल सखाराम गवारी या तेथील स्वयंसेवक होत. पण एकही दिवस वर्ग चालता नसल्याचे या महिला लाभार्थ्याने सांगितले.

३.७ पुणे जिल्हयातीलन आंबेगांव तालुक्यातील गोहे बु. येथील महादेव कोळी जमातीची सदरहू महिला लाभार्थी निरक्षर असून त्यांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. त्या व्यतिरिक्त घरातील एक व्यक्ती नोकरीस आहे. घरातील स्त्रिया या उरलेल्या वेळात शेतमजूरी करतात.

त्यांच्या मालकीची एकूण ३ एकर कोरडवाहू जमीन आहे. त्यांच्या कुटुंबांस वार्षिक उत्पन्न रु.२५००/- इतके आहे. उत्पन्नानुसार त्यांचा समावेश दारिद्र रेषेखालील गटात होतो.

सदर निरक्षर महिला लाभार्थीचे वय वर्षे २३ आहे. एकत्र कुटुंब असल्याने घरात त्या महिलेचे दीर, जाऊ, सासरे व तिचा पती व संबंधित महिला अशा ५ व्यक्तींचा परिवार आहे. घरातील दोन व्यक्ती साक्षर असून बाकी महिला व सासरे निरक्षर आहेत. या महिलेलाही साक्षर व्हावेसे वाटते. साक्षरता वर्गांना ही महिला नियमित उपस्थित असते. साक्षरता वर्ग डिसेंबर, १९९२ पासून सुरु झाले. निरक्षरतेमुळे महिलेस कोणत्या अडचणी येतात, हे विचारले असता सामाजिक व आर्थिक अडचणी निर्माण होत असल्याचे या महिलने सांगितले. संबंधित महिलेच्या घरी ३ वर्षे वयाची पुतणी व १ वर्षे वयाचा एक पुतण्या आहे. अद्याप शाळेत जाण्याच्या वयोगटातील ही मुले नाहीत.

डिसेंबर, १९९२ मध्ये साक्षरता वर्गांना प्रारंभ झाला. रात्री ९ वाजता वर्ग सुरु होत असत. १३ प्रौढांचा मिळून हा वर्ग होता व श्री.बारकू सिताराम भवारी व श्री.द.जा.साबळे, हे वर्गशिक्षक होत. साक्षरता वर्गांना नियमित उपस्थित राहिल्याने त्यांना साक्षरतेच्या त्यांच्या दैंनदिन जीवनात चांगला उपयोग झाला. उदा.वाचणे, लिहिणे, सही करणे, पैशाची बेरीज, वजाबाकी, जमाखर्च,दुकानातील हिशोब इ. करण्यात त्यांना आता पूर्वीइतकी अडचण येत नाही.

३.८ पुणे जिल्हयातील आंबेगांव तालुक्यातील मु.पो.गोहे खु. येथील महादेव कोळी जमातीची सदरहू महिला लाभार्थी निरक्षर असून त्यांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. शेती व्यतिरिक्त त्यांचा अन्य दुय्यम व्यवसाय नाही.

त्यांच्या मालकीची एकूण ५ एकर कोरडवाहू जमीन असून त्यामधून त्यांना मिळणारे वार्षिक उत्पन्न रु.१२००/- इतके आहे.उत्पन्नानुसार त्यांचा समावेश दारिद्र रेषेखालील गटात होतो.

सदर निरक्षर महिला लाभार्थीचे वयय यअंदाज ४५ वर्षे आहे. सदर महिलेच्या पतीस दोन बायका असून ही निरक्षर महिला प्रथम पत्नी होय. दुसरी पत्नी ही साक्षर आरहे. दुसरी पत्नी साक्षरता वर्गांना नियमित जात असल्याने ती साक्षर झाली आहे. सदर महिला लाभार्थीस शिक्षणाची आवड आहे. साक्षर व्हावे, असे तिला वाटते. परंतू शेतात काम करुन आल्यावर दमून गेल्यासारखे होत असल्याने साक्षरता वर्गांना उपस्थित राहू शकत नाही.

निरक्षरतेमुळे येणाऱ्या अडचणीमुळे लाभार्थीस अनेकदा पश्चाताप होतो. हिशोब येत नाही. व्यवहार कळत नाही. दुकानदार अशिक्षितपणाचा फायदा उठवितो. निरक्षरतेमुळे वाचता येत नाही. त्यामुळे लाभार्थी वारंवार अडचणीत येतो.

डिसेंबर, १९९२ मध्ये ही महिला प्रौढ साक्षरता वर्गांना उपस्थित राहू लागली. त्यांच्या वर्गामध्ये एकूण १० प्रौढ साक्षरतेचे शिक्षण घेत होते. त्यांना इंदूबाई कमाजी बांबळे या वर्गशिक्षिका होत्या. रात्रीच्या वेळी प्रौढांना साक्षर करण्याचे काम त्या करीत असत.

३.९ पुणे जिल्हयातील आंबेगांव तालुक्यातील मु.पो.गोहे बु.भिंगाडेवाडी येथील महादेव कोळी जमातीचे सदरहू कुटुंब. कुटुंबातील कुटुंब प्रमुख व्यक्ती वय वर्षे ४५ वर्षे हे साक्षर आहेत.त्यांचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. त्या व्यतिरिक्त त्यांचा अन्य दुय्यम व्यवसाय नाही.

त्यांच्या मालकीची एकूण ७५ एकर जमीन असून त्यांचे वार्षिक उत्पन्न रु.१०,०००/- आहे. उत्पन्नानुसार त्यांचा समावेश दारिद्रय रेषेवरील गटात होतो. कुटुंबात एकूण ४ व्यक्ती आहेत. पत्नी वय वर्षे ३४ या नवसाक्षर आहेत. मुलगी वय वर्षे २२ नवसाक्षर आहे व मुलगा वय वर्षे १५ हा ही नवसाक्षर आहे. नवसाक्षर असले तरी गांवातील साक्षरता वर्गांना नियमित उपस्थित राहू शकत नाही,याचे कारण विचारल्यावर त्यांनी सांगितले की, त्यांचे घर गांवाबाहेर आहे. प्रौढ साक्षरता वर्ग हे गांवात आहेत. घर व गांवातील अंतर जास्त आहे. रात्रीच्या वेळी गांवात जाणे धोकादायक वाटते. वाघांची भिती असते आणि म्हणूनच वर्गांना अनियमितपणे उपस्थित राहतात.

निरक्षरतेमुळे या प्रौढ नवसाक्षरांना काय अडचणी येतात. हे जाणून घेतले असता वाचता येत नाही. त्यामुळे प्रवास करण्यामध्ये अडचणी निर्माण होतात.

या कुटुबांमध्ये एकूण ३ व्यक्ती नवसाक्षर आहेत. डिसेंबर,१९९१ मध्ये प्रौढ साक्षरता वर्गांना सुरुवात झाली. रात्री ९ ते ११ वाजेपर्यंत एकूण ३५० दिवस हे वर्ग सुरु होते. वर्गात एकूण ४९ प्रौढ प्रशिक्षणास येत असत. साक्षर झाल्यानंतर त्यांना लिहिता वाचता येऊ लागले. हिशोब करता येऊ लागले आहे. रेशनकार्डावरील व्यवहार समजू लागले. हिशोबांची बेरीज व वजाबाकी करता येऊ लागली.

नवसाक्षर झाल्यापासून एकाच कुटुंबातील वरील तीन नव साक्षरांचा आत्मविश्वास वाढला. सहीचे महत्व समजून कशासाठी सही करावयाची याचे ज्ञान झाले.

३.१० पुणे जिल्हयातील आंबेगांव तालुक्यातील गोहे खु.शिंगाडेवारी येथील या नवसाक्षरत महिला होय. महादेव कोळी या अनुसूचित जमातीतील या नवसाक्षर महिला आहेत. शेती हा त्यांचा मुख्य व्यवसाय असून मोलमजूरी/रोजंगदारीवर कामाला जाणे हा त्यांचा दुय्यम व्यवसाय होय.

या कुटुंबांच्या नांवावर २० एकर कोरडवाहू जमीन आहे. त्यापासून त्यांना मिळणारे वार्षिक उत्पन्न रु.४८००/- इतके आहे. उत्पन्नानुसार त्यांचा समावेश दारिद्रय रेषेखालील गटात होतो. कुटुंबात एकूण १ पुरुष, दोन मुले व ही नवसाक्षर महिला असे ४ व्यक्तींचे कुटुंब आहे. सदर महिलेचा पती हा साक्षर आहे व मुले अनुक्रमे ९ व ७ वर्षांची आहेत. पण दोनही मुले शाळेत जात नाहीत. त्यांना शिक्षणाचे महत्व अद्यापही म्हणावे तितकेसे पटलेले दिसत नाही.

सदर महिला साक्षर होण्यापूर्वी तिला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत होते. दुकानावरच्या पाट्या वाचता येत नाहीत. पत्र वाचता येत नाही. हिशोब करता येत नसत.

तथापि, साक्षरता वर्गांना जायला लागल्यापासून त्यांच्या वरील अडचणी कमी होत गेल्या. प्रौढ साक्षरता वर्ग रात्री ९.०० ते ११ या वेळात चालत असत. एकूण ३५० दिवस साक्षरता वर्ग चालले. सदर महिलेस दररोज साक्षरता वर्गांना उपस्थित राहणे शक्य झाले नाही. याचे कारण जाणून घेतले असता दिवसभर काम करुन थकवा येतो व रात्री परत लिहायला कंटाळा येतो.

साक्षर झाल्यानंतर या महिलेच्या ज्ञानात काय भर पडली हे जाणून घेतले असता जमाखर्च करता येतो. लिहिता वाचता येते. रेशनकार्ड वाचता येते. अर्ज करता येतो. दुकानावरील नावाच्या पाट्या वाचता येतात. एस.टी.गाडीवरील गांवाची पाटी वाचता येते. स्वत:ची सही करता येते. सहीचे महत्व समजते.

३.११ पुणे जिल्हयातील आंबेगांव तालुक्यातील गोहे खु.येथील हे नवसाक्षर लाभार्थी, महादेव कोळी जमातीचे असून त्यांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. शेती व्यतिरिक्त त्यांचा अन्य दुय्यम व्यवसाय नाही.

त्यांच्या मालकीची एकूण ५ एकर कोरडवाहू जमीन असून त्यांचे वार्षिक उत्पन्न रु.४८००/- इतके आहे.उत्पन्नानुसार त्यांचा समावेश दारिद्रय रेषेखालील गटात हातो.

सदर नव साक्षर लाभार्थीचे वय ३५ वर्षे असून पत्नी व दोन मुली मिळून एकूण ४ माणसांचे कुटुंब आहे. कुटुंबातील अन्य तीन व्यक्ती म्हणजे पत्नी व दोन मुली या शाळेत जातात.

साक्षर होण्यापूर्वी सदर नवसाक्षर मधून मधून साक्षरता वर्गांना उपस्थित राहत होते. साक्षरता वर्गामध्ये दिवाबत्तीची गैरसोय होती. एकाच दिव्यावर ३१ प्रौढांना अभ्यास करावा लागत असल्याने लाभार्थींस इच्छा असूनही शिक्षणाचा पुरेसा लाभ घेता आला नाही.साक्षरता वर्ग एकूण ३५० दिवस चालला. रात्री ८.०० ते १०.०० या वेळात साक्षरता वर्ग चालत असत.

३.१२ अमरावती जिल्हयातील धारणी तालुक्यातील धुळघाट येथील कोरकू जमातीची सदरहू महिला लाभार्थी निरक्षर असून त्यांच्या कुटुंबांचा मुख्य व्यवसाय शेतमजूरी हा आहे. या व्यतिरिक्त त्यांच्या अन्य दुय्यम व्यवसाय नाही. रोजंदारीवर काम करुन दिवसभर मिळले त्या मजूरीवर गुजराण करुन पोट भरणे असा त्यांचा दिनक्रम आहे.

हे कुटुंब भूमीहीन आहे. त्यांना वर्षभरात पावसाळ्यातील तीन महिने रोजगार उपलब्ध होत नाही. उर्वरित २६५ दिवस त्यांना रोजगार उपलब्ध होतो. दररोज ८/- रु. या प्रमाणे २६५ दिवसामध्ये त्यांचे रु.२१२०/- एवढे वार्षिक उत्पन्न होते.उत्पन्नानुसार त्यांचा समावेश दारिद्रय रेषेखालील गटात होतो. या कुटुंबातील सर्व व्यक्ती निरक्षर आहेत. त्यांना शासनाच्या कोणत्याही योजनांची माहिती नाही. तसेच त्यांना कोणत्याही शासकीय योजनांपासून लाभ

झालेला नाही. अथवा शासकीय योजनांपासून लाभ घेण्यासही इच्छुक दिसले नाहीत. अशाप्रकारे निकृष्ट प्रतीचे जीवन हे कुटुंब जगत आहे. त्यांच्याकडे जमीन तर नाहीच पण पशुधनही नाही. त्यामुळे पशुधनापासूनही उत्पन्न मिळू शकत नाही. अशाप्रकारे निकृष्ट प्रतीचे जीवन जगणारे हे कुटुब. सदर निरक्षर महिला लाभार्थी वय अंदाजे २२ वर्षाचे असून सदर स्त्री ही कुटुबांतील सून आहे. कुटुबांमध्येसुपटी ही १२ वर्षाची नणंद व ९ वर्षाचा विनोद हा दीर आहे. याशिवाय आईवडिल असे ५ व्यक्तीचे कुटुंब आहे.

सदर निरक्षर महिलेस घरचे काम करण्यासाठी पालकांनी शाळेत घातले नाही. आता साक्षर व्हावे,असे वाटते का ?, असे विचारले असता आता कशासाठी शिकायचे, असे निराशाजनक उत्तर दिले. दोन महिन्यांचे एक छोटसे बाळ असल्याने साक्षरता वर्गांना नियमित उपस्थित राहू शकत नाही. स्वत: निरक्षर असली तरी मुलांनी शिक्षण घ्यावे असे मात्र या महिलेस वाटते. कुटुंबात तर दीर शाळेत जात नाहीत. नणंद इ.४ थी मध्ये शिकत आहे. ही महिला तीन महिन्यापूर्वी प्रौढ प्रशिक्षण वर्गात दाखल झाली, परंतू तिच्या अडचणीमुळे ती या वर्गांना नियमित उपस्थित राहू शकत नाही.

निरक्षरतेमुळे कोणकोणत्या अडचणींना तोंड द्यावे लागते याचे विश्लेषण करतांना लिहिता वाचता येत नसल्याने नांवाच्या पाटया वाचता येत नाहीत. सही करता येत नाही, हिशोब करता येत नाही. जमा खर्च करता येत नाही.इ.बाबी अवगत नसल्याचे या महिलेने सांगितले.

३.१३ अमरावती जिल्हयातील धारणी तालुक्यातील दुनी येथील कोरकू या अनुसूचित जमातीची सदरहू महिला लाभार्थी निरक्षर आहे. त्यांच्या कुटुबांचा मुख्य व्यवाय शेतमजूरी हा आहे. या व्यतिरिक्त त्यांच्या अन्य दुय्यम व्यवसाय नाही. पावसाळयाचे दिवस सोडून उर्वरित दिवसात दिवसभर काम करुन मिळेल त्या मजूरीवर गुजराण करुन पोट भरणे हा त्यांचा दिनक्रम आहे.

हे कुटुंब भूमीहीन आहे. वर्षभरातील जेमतेम ८ महिने रोजगार उपलब्ध होतो. कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न रु.१०००/- इतके आहे. उत्पन्नानुसार त्यांचा समावेश दारिद्रय रेषेखालील गटात होतो. कुटुंबातील सदर महिला वय वर्षे ४९, रखमो, वय वर्षे ३२, ही महिला निरक्षर आहे. जयंती ही मुलगी इयत्ता १ ली मध्ये दाखल झाली व नंतर शाळा सोडून दिली. सध्या ती घरकाम करते. शासनाच्या कोणत्याही योजनांची त्यांना माहिती नाही. शासकीय योजनांपासून त्यांनी लाभही घेतलेला नाही, अथवा शासकीय योजनांचा लाभ घेण्यास इच्छुकही दिसले नाहीत. घरात अत्यंत निकृष्ट प्रतीचे जीवन जगत आहेत. त्यांच्याकडे जमीन नाही(भूमीहीन) व पशुधनही नाही.

सदर महिलेस निरक्षरतेमुळे वाचता येत नाही व लिहिता येत नाही. व्यावहारिक हिशोब करता येतात. जमा खर्च करता येतात. लहानपणी शाळेत का घातले नाही.हे विचारले असता पालक अज्ञानी,शिक्षणाचे महत्व पटलेले नाही. स्त्रियांनी शिक्षण घेऊन काय करायचे, इ.कारणामुळे शाळेत घातले नाही.

सदर निरक्षर महिला प्रौढ साक्षरता वर्गांना मार्च, १९८६ मध्ये आठ महिने जात होती. हा वर्ग श्रीमती सुशिला दामोदर कस्तुरते या स्वयंसेविका चालवित होत्या. वर्गामध्ये एकूण ३० निरक्षर या प्रौढ साक्षरता वर्गांना येत होते.

साक्षरता वर्गांना उपस्थित राहायला लागल्यापासून थोडे थोडे वाचता येऊ लागले होते.जमाखर्च करता येऊ लागले होते.

३.१४ अमरावती जिल्हयातील धारणी तालुक्यातील मु.पो.दुनी येथील गवलाण या अनुसूचित जमातीची सदरहू निरक्षर लाभार्थी. त्यांच्या कुटुंबांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. या व्यतिरिक्त त्यांचा अन्य दुय्यम व्यवसाय नाही.

यांच्या मालकीची एकूण १.७५ एकर शेतजमीन आहे. शेतीपासून त्यांना मिळणारे वार्षिक उत्पन्न रु. १०,०००/- इतके आहे. उत्पन्नानुसार त्यांचा समावेश ' दारिद्रय रेषेखालील' गटात होतो.

सदर निरक्षर लाभार्थीचे वय २७ वर्षे आहे. कुटुबांत सदर प्रौढ निरक्षर लाभार्थीचे आई वडिल, वय वर्षे अनुक्रमे ६०,५४ हे असतात, त्याशिवाय दोन बहिणी आहेत. कुटुंबातील बबिता ही सर्वात धाकटी बहीण शाळेत जाते. उर्वरित कुटुबातील सर्व व्यक्ती निरक्षर आहेत. पालकांनी केवळ शाळेत दाखल न केल्यामुळे निरक्षर व्यक्तींची संख्या जास्त आहे. सदर प्रौढ निरक्षरास शाळेत जाण्याची इच्छा आहे.

निरक्षरतेमुळे सदर प्रौढास वाचन, लेखन येत नाही. आर्थिक व्यवहार नीटसे समजत नाहीत. अर्ज करता येत नाहीत. बँकेचे व्यवहार जमत नाही. कोणत्याही प्रकारचा जमाखर्च लिहिता येत नाही. दुकानावरील, बसगाड्यावरील, नांवाच्या पाटया वाचता येत नाही.

मार्च, १९८६ मध्ये सदर प्रौढ निरक्षर हा साक्षरता वर्गांना उपस्थित राहू लागला. प्रौढ साक्षरता वर्ग एकूण ८ महिने चालला. वर्गात लाभार्थ्याबरोबर एकूण ३० निरक्षर लाभार्थी साक्षरता वर्गांना येत होते. श्री.महादेव दामोदर कस्तुतरे हे स्वयंसेवक त्यांचा वर्ग चालवित असत.

लाभार्थ्यांने साक्षरोत्तर कार्यक्रमानंतर साक्षरतेचा उपयोग होतो, असे म्हटले असले तरी त्याला केवळ वाचण्यापलिकडे काहीही ज्ञान प्राप्त झाले नाही. अर्ज करणे, बँकेचा व्यवहार पाहणे या बाबी त्याला जमत नाहीत.

३.१५ अमरावती जिल्हयातील धारणी तालुक्यातील मु.पो.चाकदी येथील ही निरक्षर महिला लाभार्थी. सदर लाभार्थी 'कोरकू' या अनुसूचित जमातीची असून शेती हा त्यांच्या कुटुंबांचा मुख्य व्यवसाय आहे. या व्यतिरिक्त शिवणकाम हा त्यांचा अन्य दुय्यम व्यवसाय आहे.

त्यांच्या मालकीची ३ एकर कोरडवाहू जमीन आहे. शेतीपासून त्यांना मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये २०००/- इतके आहे. उत्पन्नानुसार त्यांच्या समावेश दारिद्रय रेषेखालील गटात होतो.

निरक्षर लाभार्थीचे कुटुंबात एकूण ६ व्यक्ती आहेत. कुटुंब प्रमुख व त्यांची पत्नी वय वर्षे ६० व ५५ हे दोघेही निरक्षर आहेत. त्यांचा मुलगा वय वर्षे ३० हा साक्षर आहे. सदर महिला लाभार्थी वय २५ सौ.काली ही निरक्षर आहे. त्यांना दोन अपत्ये आहेत. योगिता वय वर्षे ३ व मनिष वय वर्षे ७ महिने हे दोन जण अद्याप शाळेत जाण्याच्या वयोगटात नाहीत. सदर सौ काली या निरक्षर महिलेस शिक्षण घ्यावेसे वाटते. निरक्षर असण्याचे/राहण्याचे कारण काय हे विचारले असता गांवात शाळा नसल्यामुळे शिक्षण घेता आले नसल्याचे या महिलेने सांगितले.

निरक्षरतेमुळे कोणत्या समस्या निर्माण होतात. हे विचारले असता, मुलांचे संगोपन व्यवस्थित होऊ शकत नाहीत, असे या निरक्षर महिलेने सांगितले.

१.१०.९२ पासून सदर निरक्षर महिला साक्षरता वर्गांना उपस्थित राहू लागली. हा वर्ग रात्रीच्या वेळी भरत असे. वर्षभर वर्ग भरला . एकूण २० निरक्षर या वर्गांना उपस्थित राहत होते. श्री.दयाराम बाबू बेठेकर हे स्वयंसेवक शिक्षक म्हणून काम पाहत होते. लाभार्थ्याला छोटे मूल असल्यामुळे साक्षरता वर्गांना उपस्थित राहता आले नाही. लाभार्थ्याने

साक्षर झाल्यामुळे लिहिणे, वाचणे, अर्ज करणे, हिशोब करणे हे येत असल्याचे म्हटले असले तरी लाभार्थ्यांच्या ज्ञानात भर पडल्याचे दिसून आले नाही.

३.१६ अमरावती जिल्हयातील धारणी तालुक्यातील मु.पो.दुनी येथील ही निरक्षर महिला लाभार्थी. हे कुटुंब कोरकू या आदिवासी जमातीचे आहे.त्यांच्या कुटुंबांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. या व्यतिरिक्त त्यांचा अन्य दुय्यम व्यवसाय नाही.

त्यांच्या कुटुंबाच्या मालकीची ४ एकर एवढी कोरडवाहू शेतजमीन आहे. शेतीपासून त्यांना मिळणारे वार्षिक उत्पन्न रु.२०००/- इतके आहे. उत्पन्नानुसार त्यांचा समावेश दारिद्रय रेषेखालील गटात होतो.

सदर निरक्षर लाभार्थीचे कुटुंबात एकूण ५ व्यक्ती आहेत. कुटुंब प्रमुख पुरुष व सदर महिला ही त्यांची पत्नी. या शिवाय ७ वर्षे वयाची,५ वर्षे वयाची व ३ वर्षे वयाची अशा ३ कन्या मिळून ५ व्यक्तींचे हे कुटुंब आहे. कुटुंब प्रमुख सोडून घरातील सर्व व्यक्ती निरक्षर आहेत. मुलींना अद्याप शाळेत दाखल केलेले नाही. सदर निरक्षर महिलेला तिच्या पालकांनी शाळेत न घातल्यामुळे शिक्षण घेता आले नाही. या निरक्षर महिलेस साक्षर व्हावे, असे वाटत आहे. कारण निरक्षरतेमुळे येणाऱ्या अडचणीमुळे महिला लाभार्थीस अनेकदा पश्चाताप होतो. लिहिता वाचता येत नाही. हिशोब करता येत नाही. अशिक्षितपणाचा फायदा घेऊन दुकानदार महिलेस फसवतात,वजनातही फसवतात व हिशोबात फसवतात.

स्वतःच्या अशिक्षितपणाचा पश्चाताप होऊन लाभार्थीस मुलांनी शिक्षण घ्यावे असे वाटत असले तरी अद्याप मुलीला शाळेत मात्र घातलेले नाही.

दुनी या गांवी १.१०.९२ पासून रात्रीच्या वेळी प्रौढ साक्षरता वर्ग सुरु झाले. श्रीमती मार्सेलिना जोजो या त्यांच्या वर्गशिक्षिका होत. सदर महिला साक्षरता वर्गांना अधून मधून उपस्थित राहत असे.

## प्रकरण ४

## सर्वेक्षण आकडेवारीचे संकलन व त्यावरील पार्श्वभूमी

४.१ क्षेत्रीय पाहणीमध्यें एकूण १८८ आदिवासी कुटुंबांची पाहणी करण्यात आली. क्षेत्रीय पाहणीसाठी निवडलेल्या या १८८ लाभार्थी कुटुंबाच्या माहितीचे पृथ:करण करण्यात आले. ही माहिती तक्ता क्र. ४.१ पासून तक्ता क्र.४.८ पर्यंत दिलेली आहे.


तक्ता क्र.४.१


पाहणी केलेल्या कुटुंबांची जमातीनुसार साक्षर व निरक्षरतेची विभागणी

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | जमात | कुटुंबांची संख्या | कुटुंबातील व्यक्ती | | | लाभार्थी संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | १ ते ५ पर्यंत | ५ ते ८ पर्यंत | ८ च्या पुढे | साक्षर | निरक्षर | एकूण |
| १. | पुणे | जुन्नर | महादेव कोळी | ३४ | १६ | ११ | ०७ | २८ | ६६ | ९४ |
| | | आंबेगांव | महादेव कोळी | ९० | ५९ | २७ | ०४ | २३७ | १०३ | ३४० |
| २. | अमरावती | धारणी | कोरकू | ६० | ४२ | १३ | ०५ | ५३ | ११५ | १६८ |
| | | | गोंड | ४ | ४ | ०० | ०० | ०३ | ८ | ११ |
| | एकूण | | | १८८ | १२१ | ५१ | १६ | ३२१ | २९२ | ६१३ |
| | टक्केवारी | | | १०० | ६४.३६ | २७.१३ | ८.५२ | ५२.३६ | ४७.६४ | १०० |

उपरोक्त तक्त्यावरुन १ ते ५ पर्यंत व्यक्ती असणाऱ्या कुटुंबांची संख्या ६४ टक्के इतकी आढळून आली. ५ ते ८ व्यक्ती असणाऱ्या कुटुबांची संख्या २७ टक्के इतकी आढळून आली. तर कुटुबांमध्ये ८ च्या पुढे व्यक्ती असणाऱ्या कुटुबांची संख्या सर्वात कमी ९ टक्के इतकी असलयाचे आढळून आले.

१८८ लाभार्थी कुटुंबामध्ये ३२१ व्यक्ती साक्षर असल्याचे आढळून आले. तर २९२ व्यक्ती निरक्षर असल्याचे आढळून आले.


Chart Showing Tribewise Total, literate & illiterate no. of Beneficiaries From Pune District.
350
300
250
200
150
100
50
0
Total beneficiaries
Literate person
illiterate person
Mahadeo Koli Junnar Tahsil
Mahadeo Koli Ambegaon Tahsil
Tribe From Tahsil


Chart Showing tribewise total, literate & illiterate no. of bebeficiries
from Amravati District.
No. of Beneficiries
180
160
140
120
100
80
60
40
20
0
Korku
Dharni Tahsil
Gond
Dharni Tahsil
Tribe From Tahsil
Total beneficiaries
Literate person
Illiterate person

तक्ता क्र४.२

लाभार्थींचे वार्षिक उत्पन्नानुसार वर्गीकरण

| अ.. क्र | जिल्हा | तालुका | एकूण लाभार्थी | वार्षिक उत्पन्न | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ० ते ५०० | ५०० ते १००० | १००१ ते २००० | २००१ ते ३६०० | ३६०१ ते ५००० | ५००१ ते ६४०० | ८००० च्या पुढे | माहिती निरंक |
| १. | पुणे | जुन्नर | ३४ | - | ५ | १९ | ७ | - | १ | २ | - |
| | | आंबेगांव | ९० | - | ३ | १७ | ७ | ५४ | ४ | ३ | २ |
| २. | अमरावती | धारणी | ६४ | १० | ९ | ३२ | ६ | ३ | ३ | ० | १ |
| एकूण | | | १८८ | १० | १७ | ६८ | २० | ५७ | ८ | ५ | ३ |
| टक्केवारी | | | १०० | ५ | ९ | ३६ | ११ | ३० | ४ | ३ | २ |

उपरोक्त तक्त्यावरुन ० ते १०००/- या कमी उत्पन्न गटामध्ये १४ टक्के कुटुबांचा भरणा होता. तसेच ५००० च्या पुढे तुलनेने जास्त उत्पन्न गटामध्ये एकूण ९ टक्के कुटुबांचा भरणा होता. वरील दोन्ही उत्पन्न गटामध्ये तुलनेने कमी कुटुबांचा समावेश असल्याचे आढळून आले. या उलट १००१ ते २००० या उत्पन्न गटामध्ये सर्वाधिक म्हणजे ३६ टक्के कुटुबांचा समावेश असलयाचे आढळून आले. त्या खालोखा ३६०१ ते ५००० या उत्पन्न गटामध्ये ३० टक्के लाभार्थी असल्याचे आढळून आले.

रु.० ते ३६०० या उत्पन्न अल्प गटामध्ये ६१ टक्के लाभार्थींचा समावेश असल्याचे आढळून आले. उर्वरित ३९ टक्के लाभार्थी हे ३६०० रुपयापेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न घेत असल्याचे आढळून आले.

दारिद्रय रेषेखालील रु.६४०० या उत्पन्न गटातील एकूण ९६.०० टक्के लाभार्थी आढळून आले. उर्वरित ४.२० टक्के लाभार्थी हे उच्च उत्पन्न गटातील आहेत, हे स्पषट होते.

वरील आकडेवारीवरुन अत्यल्प उत्पन्न गटातील व ५,००१ च्या पुढील उत्पन्न गटातील कुटुबांची संख्या मर्यादित (कमी) आहे, तर मध्यम उत्पन्न गटामध्ये बहसंख्या (७७ टक्के) कुटुबांचा भरणा आहे.

तक्ता क.४.३

जमातीनिहाय साक्षरता प्रसाराची आकडेवारी दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | जात/ जमात | एकूण कुटुंबे | कुटुंबातील व्यक्ती | | | लाभार्थी संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | १ ते ५ | ५ ते ८ | ८ च्या पुढे | साक्षर | निरक्षर |
| १. | पुणे | जुन्नर | महादेव कोळी | ३४ | १६ | ११ | ०७ | २८ | ६६ |
| | | आंबेगांव | महादेव कोळी | ९० | ५९ | २७ | ०४ | २३७ | १०३ |
| २. | अमरावती | धारणी | कोरकू | ६० | ४२ | १३ | ०५ | ५३ | ११५ |
| | | | गोंड | ४ | ४ | ०० | ०० | ०३ | ८ |
| | एकूण | | | १८८ | १२१ | ५१ | १६ | ३२१ | २९२ |
| | टक्केवारी | | | १०० | ६४ | २७ | ९ | - | - |

उपरोक्त तक्त्यावरुन ६४ टक्के कुटुंबातील व्यक्तींची संख्या १ ते ५ इतकी असल्याचे आढळून आले. तर ८ व्यक्तीपेक्षा जास्त संख्या असलेली फक्त ९ टक्के कुटुंबे आढळून आली.

याचा अर्थ लहान कुटुबांची संख्या जास्त आढळली व मोठे कुटुंबाची संख्या कमी असल्याचे आढळून आले.

एकूण १८८ कुटुंबामध्ये ३२१ व्यक्ती साक्षर असल्याचे आढळून आले व २९२ व्यक्ती या निरक्षर असल्याचे आढळून आले.

साक्षर व निरक्षर व्यक्ती कोणत्या वयोगटातील आहेत, याची माहिती कुटुंब प्रमुखांना सांगता आली नाही. त्यामुळे साक्षर व निरक्षर व्यक्तींचा वयोगट देता आला नाही.

तक्ता क्र.४.४

दारिद्रय रेषेखालील लाभार्थींचे तालुकानिहाय वर्गीकरण

| अ. क्र. | जिल्हा | तालुका | एकूण लाभार्थी | दारिद्रय रेषेखालील लाभार्थी | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे | जुन्नर | ३४ | ३२ | ९४.११ |
| | | आंबेगांव | ९० | ८८ | ९७.७७ |
| २. | अमरावती | धारणी | ६४ | ५८ | ९०.६२ |
| एकूण | | | १८८ | १७८ | ९४.६८ |

उपरोक्त तक्त्यावरुन ९५ टक्के लाभार्थी हे दारिद्रय रेषेखालील असल्याचे आढळून आले. याचा अर्थ फक्त ५ टक्के लाभार्थी हे दारिद्रय रेषेच्यावर आहेत, असे दिसून येते. पुणे जिल्हयातील आंबेगांव तालुक्यात दारिद्रय रेषेखालील लाभार्थी सर्वाधिक (९८ टक्के) असल्याचे आढळून आले.

तक्ता क्र.४.५

निरक्षरतेमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचे वर्गीकरण

| अ. क्र. | प्राथमिक अडचणी | | | दुय्यम अडचणी |
|---|---|---|---|---|
| | अडचणी | लाभार्थी संख्या | टक्केवारी | अडचणी |
| १. | दुकानाच्या, एस.टी.च्या पाटया, रेशनिंग कार्डस, पत्र. अर्ज इ.लिहिता वाचता येत नाही | ५१ | ३७ | १. पश्चाताप होतो.<br>२. परगांवी जाता येत नाही<br>३. घर सुधारले नाही |
| २. | सामाजिक आर्थिक समस्या | २९ | २१ | ४. सही करता येत नाही |
| ३. | हिशोब येत नाही | २० | १४ | ५. शासकीय योजना समजत नाही.<br>६. सरकारी मदत काय मिळते हे समज त नाही. |
| ४. | फसवणूक होते | १६ | १२ | |
| ५. | व्यवहार कळत नाही | १३ | ९ | ७. मुलाचें शिक्षणाचे महत्व लक्षात येत नाही. |
| ६. | प्रवासात अडचण | ६ | ४ | |
| ७. | नोकरी/रोजगार नाही | ४ | ३ | ८. मुलांचे संगोपन व्यवस्थित करता येत नाही |

उपरोक्त तक्त्यामध्ये निरक्षरतेमुळे येणाऱ्या अडचणी व विविध समस्यांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. निरक्षरतेमुळे ३७ टक्के निरक्षरांना दुकानाच्या पाटया, एस.टी.वरील पाटया, रेशनकार्ड, पत्र, अर्ज वाचता येत नाही. १४ टक्के लाभार्थीना हिशोब येत नाही तर १२ टक्के लाभार्थींची निरक्षरतेमुळे फसवणूक होते. ४ टक्के लाभार्थीनी लिहिता, वाचता येत नसल्याने प्रवासात अडचणी येत असल्याचे सांगितले, तर ३ टक्के लाभार्थीनी शिक्षणाअभावी नोकरी मिळत नसल्याचे सांगितले. दुय्यम अडचणीमध्ये शासकीय योजना समजत नाही. सरकारी मदत काय मिळते हे समजत नाही.

तक्ता क्र.४.६

पुणे व अमरावती जिल्हयातील निवडलेल्या लाभार्थींची संख्या दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | अ.क्र. | गांवाचे नांव | निवडलेली लाभार्थी संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १. | पुणे | जुन्नर | १ | तळेरान | ३४ |
| | | आंबेगांव | २ | गोहे खु | ५० |
| | | | ३. | गोहे बुद्रूक | ४० |
| २. | अमरावती | धारणी | ४. | राजपूर | १२ |
| | | | ५. | दुनी | ९ |
| | | | ६. | चाकदी | ४ |
| | | | ७. | चुटीयाँ | ७ |
| | | | ८. | धूळघाट | ५ |
| | | | ९. | शेरा | २ |
| | | | १०. | कलमरवार | ८ |
| | | | ११. | साद्रीवाडी | ८ |
| | | | १२. | बैरागड | ९ |
| एकूण | | | | | १८८ |

उपरोक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे पुणे जिल्हयातून आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जुन्नर व आंबेगांव तालुक्यातील गांवाची निवड करण्यात आली. तर अमरावती जिल्हयातील धारणी तालुक्यातील एकूण ९ (नऊ) गांवामधील निरक्षर व साक्षर स्त्री-पुरुषांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

एकूण १८८ आदिवासी लाभार्थी यासाठी निवडण्यात आले.

४.२ जमीन धारणेचा साक्षर व निरक्षरतेवर काय परिणाम होतो, हे पाहिले असता खालील निष्कर्ष हाती आले.

तक्ता क्र.४.७
**जमीनधारणेनुसार निरक्षर लाभार्थींचे वर्गीकरण**

| अ.. क्र | जिल्हा | तालुका | एकूण लाभार्थी | जमीन धारणा (एकरामध्ये) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | भूमीहीन | ० ते १ एकर | १ ते २ एकर | २ ते ४ एकर | ४ ते ६ एकर | ६ ते १० एकर | १० च्या पुढे | माहिती निरंक |
| १. | पुणे | जुन्नर | ३४ | ३ | ४ | ७ | १० | ६ | २ | २ | - |
| | | आंबेगांव | ९० | ६ | ३ | ७ | ८ | १६ | २२ | १५ | १३ |
| २. | अमरावती | धारणी | ६४ | ३२ | ३ | ५ | ९ | ८ | ३ | - | ४ |
| एकूण | | | १८८ | ४१ | १० | १९ | २७ | ३० | २७ | १७ | १७ |
| टक्केवारी | | | १०० | २१.८० | ५.३२ | १०.१० | १४.३७ | १६.४९ | १३.८२ | ९.०५ | ९.०५ |

उपरोक्त तक्त्यावरुन आपल्या असे निदर्शनास येते की, नमुना निवडीसाठी निवडलेल्या १८८ कुटुंबापैकी २२ टक्के कुटुबे ही भूमीहीन आहेत. दोन एकरपर्यंत जमीन असणारी १५ टक्के कुटुबे आढळून आली. २ ते ४ एकर जमीन धारणा असणारी १४.३७ टक्के कुटुंबे आढळून आली. ४ ते ६ एकर जमीन धारणा असणारी सर्वात जास्त म्हणजे १६.४९ टक्के कुटुंबे आढळून आली. १३.८२ कुटुंबे ही ६ ते १० एकरच्या जमीन धारणेमध्ये असल्याचे आढळून आले. फक्त ९.०० टक्के कुटुबे ही १० एकरच्यापुढे जमीनअसणारी आढळून आली. उर्वरित ९ टक्के लोकांनी जमीन धारणेबाबतची माहिती निश्चितपणे माहिती नसल्याचे सांगितले.

तक्ता क्र.४.८
**मुख्य व दुय्यम व्यवसायानुसार लाभार्थींचे तालुकानिहाय वर्गीकरण**

| अ.. क्र | जिल्हा | तालुका | एकूण लाभार्थी | मुख्य व्यवसाय | | | दुय्यम व्यवसाय | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | शेती | शेतमजूरी | इतर व्यवसाय | शेतमजूरी | नोकरी | दुय्यम व्यवसाय |
| १. | पुणे | जुन्नर | ३४ | ३२ | - | २ | १६ | - | १ |
| | | आंबेगांव | ९० | ८३ | २ | ५ | ८ | - | ४ |
| २. | अमरावती | धारणी | ६४ | ३२ | ३० | २ | २० | - | १ |
| **एकूण** | | | **१८८** | **१४७** | **३२** | **९** | **४४** | **-** | **६** |
| **टक्केवारी** | | | **१०० %** | **७८%** | **१७%** | **५%** | **२३%** | **-** | **३%** |

उपरोक्त तक्त्यामध्ये मुख्य व दुय्यम व्यवसायानुसार लाभार्थीचे वर्गीकरण करण्यात आले आहे. शेती हा मुख्य व्यवसाय करणारी ७८ टक्के कुटुबे आढळून आली आहेत.शेतमजमूरी हा मुख्य व्यवसाय करणारी १७ टक्के कुटुबे आढळून आली आहेत. उर्वरित ५ टक्के कुटुंबे शेती व शेतमजूरी शिवाय इतर व्यवसायात गुंतलेली आहेत.

दुय्यम व्यवसायामध्ये २३ टक्के कुटुबे शेतमजूरी करणारी आढळून आली. नोकरी हा दुय्यम व्यवसाय करीत असलेले एकही कुटुब आढळले नाही. तर ३ टक्के कुटुबे दुग्धव्यवसाय हा दुय्यम व्यवसाय करुन कुटुबांसाठी आर्थिक हातभार लावत आहेत.

एकूण २६ टक्के कुटुबे दुय्यम व्यवसाय करीत असल्याचे आढळून आले आहे.

## *प्रकरण ५ वे*

## क्षेत्रीय निरीक्षण व गळतीची कारणे

क्षेत्रीय पाहणीसाठी महाराष्ट्रातील अमरावती व पुणे जिल्हयातील उपयोजना क्षेत्रातील कमी साक्षरता असलेल्या गांवाना भेटी देण्यात आल्या.

क्षेत्रीय कामकाज पाहणीमध्ये खालील बाबी आढळून आल्या-

१. प्रौढांसाठी अथवा दिवसभर काम करुन रात्रीचे शिक्षण घेण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी पुणे व अमरावती या दोन्ही जिल्हयांमध्ये अंशकालीन वर्ग अथवा रात्रीच्या शाळा उपलब्ध नसल्याचे आढळून आले.

२. अमरावती जिल्हयांमध्ये सर्वेक्षण कामकाज पाहणीच्या वेघळी संदर्भीय वर्षात प्रौढ शिक्षणाचे पायलट प्रोजेक्टर सुरु असल्याचे आढळून आले. तर प्रौढ शिक्षणाच्या कार्यक्रमास तोपावेतो प्रशासकीय मंजूरी मिळाली नसल्याचे आढळून आले.

पुणे जिल्हयांमध्ये प्रौढ साक्षरता आंदोलन कार्यक्रमाची चाचणी परीक्षा नुकतीस संपली असलयाचे आढळून आले.

३. पुणे जिल्हयात प्रौढ शिक्षण वर्ग स्वयंस्फूर्तीने राबविले जात असल्याचे आढळून आले. येथील प्रौढांच्या उपस्थितीचे प्रमाणही ७५ टक्के पेक्षा जास्त असल्याचे स्वयंसेवकांनी मुलाखतीत सांगितले.

तसेच ७५ टक्के पेक्षा जास्त प्रौढ नवसाक्षर झाल्याचेआढळले. साक्षर झालेल्या प्रौढांना यापुढेही आणखी शिक्षण देण्याचे शिक्षण विभागाचे प्रयत्न आहेत. यावरुन पुणे जिल्हयात प्रौढ शिक्षण अत्यंत उपयुक्त झाल्याचे निश्चितपणे नमूद करता येईल.

४. कार्यान्वियन अधिकाऱ्यांच्या अभिप्रायानुसार पुणे जिल्हयांमध्ये प्रौढ साक्षरता वर्गांना पुरुषापेक्षा स्त्रियांचा व मुलींचा उत्तम प्रतिसाद दिसून आला.

५. प्रौढांचे साक्षरता वर्ग चालविणाऱ्या स्वयंसेवकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. उदा.साक्षरता वर्गातील प्रौढांना लिहिण्यासाठी पाटया (Slate) नसणे. असल्यातरी पुरेशा प्रमाणात नसणे, वाचण्यासाठी पुस्तकांची संख्या अत्यंत मर्यादित असणे. साक्षरता वर्ग रात्रीच्या वेळी चालविले जात असल्याने आदिवासी क्षेत्रामध्ये मूळातच वीजेची सोय नसते व जिल्हा परिषदेकडून रॉकेलचा अथवा कंदिलांचा पुरवठा वेळेवर होत नाही. अशावेळी स्वयंसेवकांस या सोयी स्वखर्चाने पुरवाव्या लागतात. या व्यतिरिक्त स्वयंसेवकांना प्रौढांची उपस्थिती वाढविण्यासाठी प्रौढांना त्यांच्या घरोघरी जावून बोलावून आणावे लागते.

६. अमरावती जिल्हयांमध्ये पायलट प्रोजेक्ट राबविला जात असल्याने तेथील आदिवासींच्या साक्षरतेमध्ये काहीही फरक झाला नसल्याचे आढळून आले, तर पुणे जिल्हयात प्रौढ साक्षरता आंदोलन हा पूर्ण कार्यक्रम राबविला गेला. वरील दोन्हीही गटातील (नवसाक्षर व निरक्षरांच्या) मुलाखती घेतल्या असता, नवसाक्षरांच्या चेहऱ्यांवर वेगळाचा आनंद दिसून आला. व्यवहारामध्ये निरक्षरतेमुळे येणाऱ्या अडचणींपासून सोडवणूक झाल्याचे समाधान त्यांना मिळाले.

याउलट निरक्षर व्यक्तींना अनेकप्रकारच्या व्यावहारिक अडचणी व फसवणूकींच्या प्रकारांना तोंड द्यावे लागत असल्याचे दिसून आले.

७. पुणे व अमरावती जिल्हयातील निरक्षर लाभार्थींशी चर्चा केली असता त्यांच्या निरक्षर राहण्याची कारणे जाणून घेतली असता सर्व लाभार्थींनी एकच उत्तर दिले की,त्यांच्या पालकांनी घरकाम करुन घेण्यासाठी आपल्या पाल्याला शाळेत पाठविले नाही. मुर्लीच्या निरक्षरतेची कारणे जाणून घेतली असता मुलींना शिक्षणाची गरजच काय ? मुलींनी शिकून काय करायचे ? पुढे चूल व मूल हेच सांभाळायचे असल्याने मुलींना शाळेत घातले गेले नाही.

## प्रकरण ६ वे

## सूचना तथा शिफारशी

१. दिवसभर काम करुन रात्रीचे वर्गामध्ये शिक्षण घेण्यास इच्छुक असणारे तरुण व प्रौढांसाठी किमान एक रात्रशाळा अथवा अंशकालीन शाळा तालुक्याच्या ठिकाणी आस्तित्वात यावी.

२. महाराष्ट्र राज्यातील आदिवासी क्षेत्रातील आदिवासी साक्षरतेचे प्रमाण ३६.७८% आहे. त्यातही अमरावती जिल्हयातील आदिवासी साक्षरता ४४.५७ % आहे. हा जिल्हा आदिवासीमधील साक्षरतेमध्ये ५ व्या क्रमांकावर आहे. याचा अर्थ या जिल्हयातील निरक्षरतेचे प्रमाण लक्षात घेता येथील साक्षरता प्रसाराला उत्तेजन देण्यात यावे व जास्तीत जास्त लोकांना साक्षर करण्यात यावे.

३. अमरावती जिल्हयाच्या साक्षरता प्रसारांचा कार्यक्रम पुणे जिल्हा साक्षरता आंदोलन मंच या कार्यक्रमाप्रमाणे राबविण्यात यावा. निरक्षरांना उत्तेजन देण्यासाठी काही महत्वाचे चित्रीकरण दूरदर्शनवर दाखविण्यात यावे, जेणेकरुन निरक्षर प्रौढांच्या मनातील न्यूनगंड नष्ट होऊन आत्मविश्वास वाढीस लागेल.

४. प्रौढ साक्षरता कार्यक्रमास महिलांच्या बरोबरीने पुरुष वर्गाची उपस्थिती वाढविण्यासाठी 'शिक्षण विभागाकडून' व माहिती व प्रसारण विभागाकडून विशेष प्रयत्न व्हावेत.

५. साक्षरता वर्गातील निरक्षरांना देण्यात येणारे शालेय साहित्य उदा.पाटी, पुस्तके, पेन्सील्स, वेळेच्या वेळी व पुरेशा प्रमाणात देण्यात यावीत.

६. रात्रीच्या वर्गांना रॉकेल व कंदीलाचा वेळेत व पुरेशा प्रमाणात साठा पुरविण्यात यावा. जेणेकरुन या सोयी पुरविण्याचा आर्थिक भूर्दंड स्वयंसेवकांवर येऊ नये.

७. शासकीय आश्रमशाळेवर शिक्षक व आदिवासी क्षेत्रातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील प्रत्येक शिक्षकांने एका वर्षात किमान ५ आदिवासी निरक्षरांना साक्षर करण्याची मोहीम हाती घेण्यात यावी. यासाठी शासकीय पातळीवरुन विशेष प्रयत्न व्हावेत व या कामास विशेष प्राधान्य देण्यात यावे, जेणेकरुन आदिवासी क्षेत्रातील निरक्षरतेचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

८. आदिवासी पुरुष / स्त्रिया मूळात हुशार आहेत. निरक्षरतेच्या दुष्परिणामामुळे अंधश्रध्दा व फसवणूकीस बळी पडले आहेत. निरक्षरतेमुळे त्यांची प्रगती खुंटली आहे. प्रत्येक घरातील स्त्री साक्षर/सुशिक्षित झाली तर ही कुटुंबे आर्थिक व सामाजिकदृष्टया पुढे येऊ शकतील. यासाठी प्रथम स्त्रियांना साक्षर केले पाहिले. साक्षरतेचे चांगले परिणाम त्यांन समजून व पटवून दिले पाहिजेत. तरच आदिवासी समाज हा प्रवाहामध्ये सामील होईल.

शासनाने आदिवासी क्षेत्रातील शाळेत जाणाऱ्या मुलांसाठी दररोज रु.१/- उपस्थिती भत्ता देऊन शाळांमधील मुलांची उपस्थित व गळती रोखण्यासाठी चांगले पाऊल उचलले आहे. तथापि, निरक्षरांसाठी देखील अशाचप्रकारे विशेष प्रयत्न होण्याची गरज आहे.

"आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे"

"कमी साक्षरता विभागातील शैक्षणिक समस्येचा विशेषात: स्त्रियांच्या शैक्षणिक समस्येचा अभ्यास अहवाल १९९२-९३"

- - -

"प्रौढांसाठी प्रश्नावली"

चौक क्र. १] वैयक्तिक माहिती.

१] कुटुंबप्रमुखाचे संपूर्ण नाव व पत्ता. : ______________________

२] कुटुंब प्रमुखाची जात/जमात : ______________________

३] कुटुंबातील व्यक्ती [एकूण] : पुरुष [ ] स्त्रिया [ ] मुले [ ] एकूण ______

४] कुटुंबाचा प्रमुख व्यवसाय : १] शेती २] नोकरी ३] वनोत्पादन ४] शेतमजूरी ५] इतर

४] अ] कुटुंबप्रमुखाचा दुय्यम व्यवसाय :

५] कसत असलेली जमीन [एकरात] : १] कोरडवाहू ______ २] बागायत ______ एकूण ______

६] कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अंदाजे [१९९२-९३] : रू. ______________

शेरा :- वार्षिक उत्पन्न विचारताना कुटुंबप्रमुखाकडे असलेली जमीन, पशुधन, व्यवसाय. नोकरी करणारी माणसे ह्या गोष्टींचा विचार करून अंदाजित सरासरी उत्पन्न काढावे.

चौक क्र. २ निरक्षरांची माहिती

७] कुटुंबातील साक्षर व निरक्षर व्यक्तींचा तपशील –

| अ.क्र. | नांव | पुरुष/ स्त्रिया. | वय | साक्षर/ निरक्षर | निरक्षरतेची कारणे. |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | एकूण | | | | |

८] साक्षर व्हावे असे तुम्हास वाटते काय ? : ____________

९] साक्षरता वर्गांना उपस्थित राहण्यास काय अडचणी येतात ? : ____________

१०] निरक्षरतेमुळे कोणत्या समस्या निर्माण होतात ? : ____________
: ____________

११] तुमच्या मुलांनी शिक्षण घ्यावे असे तुम्हास वाटते का ? : ____________
____________

१२] सध्या कुटुंबातील किती मुले/मुली शाळेत जातात ?

अ] शाळा मध्येच सोडून घरी असलेल्या मुलांची संख्या द्या. : ____________

ब] कितव्या इयत्तेपासून शाळा सोडून दिली ? : ____________

क] घरी असणाऱ्या मुलांच्या वयाचा तपशील द्या. : ____________

चौक क्र. ३ साक्षरता वर्गाची माहिती :

१] प्रौढ शिक्षणाच्या वर्गात केव्हा दाखल झालात ?
अंदाजे वर्ष/साल : ____________________

अ] वर्ग किती दिवस चालला ? : ____________________

ब] कोणत्या वेळी वर्ग भरत होता ? : ____________________

क] वर्गात तुमच्या बरोबर किती लोक शिकत होते ? : ____________________

ड] वर्ग शिक्षकाचे नांव द्या. : ____________________

चौक क्र. ४ साक्षरोत्तर कार्यक्रम

१] तुम्ही सध्या करत असलेल्या कामात /धंद्यात साक्षरतेचा उपयोग होतो काय ? कशा प्रकारे ? : ____________________

२] पुढील गोष्टी तुम्ही केल्या आहेत काय ?
होय/नाही अशी उत्तरे लिहा --

अ] रेशन कार्ड वाचणे : होय / नाही

ब] सहकारी सोसायटी व तगाईसाठी अर्ज भरणे. : होय / नाही

क] मामलेदार, सरपंच यांचेकडे अर्ज करणे : होय / नाही

ड] बँकेच्या व्यवहारासाठी लिहीणे : होय / नाही

इ] दुकानावरील नावाच्या पाटया वाचता येतात काय ? : होय / नाही

फ] एस. टी. गाड्यांवरील गावांच्या पाटया वाचता येतात काय ? : होय / नाही

य] पैशांची बेरीज, वजाबाकी करता येते काय ? : होय / नाही

ह] शेतीचा किंवा दुकानाचा जमाखर्च लिहीता येतो काय ? : होय / नाही

दिनांक : सही

ठिकाण :